श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष १ लें. ] आश्विन शके १८४५ [ अंक ८ वा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

महाराजांचे अनुभव .... ... ... ६४-७
स्फुट विषय .... ... ... ५७-६०
श्रीसाईच्चरित .... ... ... १५३-१६८

---

## साल मजकुरीं श्रीसाईबाबांच्या पुण्यतीथी निमित्तें शिर्डी येथील कार्यक्रम खालील प्रमाणें ठरला आहे.

आश्विन शुद्ध १० शुक्रवार

(१) रुद्राभिषेक सकाळीं ८ ते १० वाजेपर्यंत.
(२) कीर्तन १२ ते २ वाजे पर्यंत.
(३) आराधन विधि २ वाजतां.
(४) ब्राह्मणभोजन ३ ,,
(५) पुराण ५ ,,
(६) रथाची मिरवणूक रात्रीं ९ वाजतां

आश्विन शुद्ध ११ शनिवार

(१) भंडारा
(२) मशिदींत कीर्तन सायंकाळीं ६ वाजतां.
(३) पालखी चावडींत नेणें रात्रीं ९ वाजतां.

आश्विन शुद्ध १२ रविवार

काला सकाळीं ९ वाजतां.

सदरहू कार्यासाठीं कोणास कांहीं पाठवावयाचें असल्यास ते रा. रा. रामचंद्र दादा पाटील कोते, मुक्काम शिर्डी, पोष्ट राहातें, या पत्त्यावर अथवा रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोळकर, टर्नर रोड, वांद्रे या पत्त्यावर पाठवावें.

### खुलासा.

श्री साईलीलेच्या पृष्ठावर जे अंक देण्यांत येतात त्यासंबंधीं कांहीं वाचकांचा गैरसमज होत आहे असें दिसतें. पृष्ठावरील अंक निरनिराळ्या विषयाला निरनिराळे दिले आहेत. हेतु हा की, शेवटीं पुस्तकें बांधतांना विषयवारीप्रमाणें तीं बांधवितां यावी. या व्यवस्थेमुळें पृष्ठावरील अंकांत विषमता दिसल्यास म्हणजे २६ व्या पृष्ठापुढें ४२ वें पृष्ठ आल्यास मधलीं २७ तें ४१ पृष्ठें आपल्याला कमी आलीं किंवा पृष्ठांक चुकीचे पडले आहेत असा समज वाचकांनीं करून घेऊं नये.

२३१३१२०७



३१

शहादें येथील एका ब्राह्मणाला फांशीची शिक्षा झाली होती. त्याच्या एका मुसलमान मित्राची महाराजांवर पूर्ण श्रद्धा होती. तो महाराजांकडे गेला आणि आपल्या स्नेह्याविषयींचा मजकूर महाराजांचे चरणीं निवेदन केला. महाराज म्हणाले "चार दिवसांनीं अल्ला भलें करील" व त्या मुसलमानाला तेथें ठेऊन घेतलें.तो तेथें असतांना खबर आली कीं, अपिलांत त्याचा स्नेही अजिवात सुटला.

( ३२ )

रा. रा. चिदंबरराव गाडगीळ हे गणपती उपासक होते. अर्थात् महाराजानां ते गणपतीच मानीत. ते महाराजांची पूजा करीत ती गणपती या भावनेनेंच व पूजेचें साहित्यही त्या तऱ्हेनेंच नेत. एक दिवस ते पूजा करीत असतानां, महाराज जवळ बसलेल्या माणसाला म्हणाले "हा म्हातारा फार ठक आहे. तो म्हणतो बाबांच्या गांडीखाली उंदीर आहे." अर्थात् ही मूषकवाहन गणपतीची खूण महाराजांनीं दिली. म्हणजे गाडगीळ आपल्याला ( म्ह. बाबांला ) गणपती मानतात हें सुचविलें.

( ३३ )

एकदां मी नगराहून एक फुलांचा शेरा आणविला होता. तो घेऊन मी महाराजांकडे गेलों. जातांना पंचवीस रुपये कनवटीला लावले. महाराजांकडे गेलों. महाराजांनीं विचारलें " हें काय आणलें " मी म्हटलें "शेरा" महाराज म्हणाले " पण यांचे बरोबर पंचवीस रुपये दक्षिणा पाहिजेना." मी म्हटलें " आपण आधींच बुद्धि दिली त्याप्रमाणें दक्षिणा आणली आहे " व त्याप्रमाणें दिली.

( ३४ )

हरिभक्त परायण माधव बुवा बडोदकर मला एकदां म्हणाले कीं, "तुम्हीं व आम्ही मिळून श्री सद्गुरु साईबाबांच्या दर्शनाला जाऊं" परंतु तसा कांहीं योगायोग जुळून आला नाहीं. परंतु त्यांचे मेहुणे संगमनेर तालुक्याला मामलेदार असतांना ते एकदां संगमनेरास गेले होते. तेथें

२७१३१८७



३१

शहादें येथील एका ब्राह्मणाला फांशीची शिक्षा झाली होती. त्याच्या एका मुसलमान मित्राची महाराजांवर पूर्ण श्रद्धा होती. तो महाराजांकडे गेला आणि आपल्या स्नेह्याविषयींचा मजकूर महाराजांचे चरणीं निवेदन केला. महाराज ह्मणाले "चार दिवसांनी अल्ला भलें करील" व त्या मुसलमानाला तेथें ठेऊन घेतलें.तो तेथें असतांना खबर आली की, अपिलांत त्याचा स्नेही अजिबात सुटला.

( ३२ )

रा. रा. चिदंबरराव गाडगीळ हे गणपती उपासक होते. अर्थात् महाराजांना ते गणपतीच मानीत. ते महाराजांची पूजा करीत ती गणपती या भावनेनेंच व पूजेचें साहित्यही त्या तऱ्हेनेंच नेत. एक दिवस ते पूजा करीत असतानां, महाराज जवळ बसलेल्या माणसाला म्हणाले "हा म्हातारा फार ठक आहे. तो म्हणतो बाबांच्या गांडीखाली उंदीर आहे." अर्थात् ही मूषकवाहन गणपतीची खूण महाराजांनी दिली. म्हणजे गाडगीळ आपल्याला ( म्ह. बाबांला ) गणपती मानतात हें सुचविलें.

( ३३ )

एकदां मी नगराहून एक फुलांचा शेरा आणविला होता. तो घेऊन मी महाराजांकडे गेलों. जातांना पंचवीस रुपये कनवटीला लावले. महाराजांकडे गेलों. महाराजांनी विचारलें "हें काय आणलें" मी म्हटलें "शेरा" महाराज म्हणाले "पण याचे बरोबर पंचवीस रुपये दक्षिणा पाहिजेना." मी म्हटलें "आपण आधींच बुद्धि दिली त्याप्रमाणें दक्षिणा आणली आहे" व त्याप्रमाणें दिली.

( ३४ )

हरिभक्त परायण माधव बुवा बडोदकर मला एकदां ह्मणाले की, "तुम्ही व आम्ही मिळून श्री सद्गुरु साईबाबांच्या दर्शनाला जाऊं" परंतु तसा कांही योगायोग जुळून आला नाहीं. परंतु त्यांचे मेहुणे संगमनेर तालुक्याला मामलेदार असतांना ते एकदां संगमनेरास गेले होते. तेथें

त्यांनीं शिर्डीस जाण्याची इच्छा प्रदर्शित केल्याबरोबर त्यांच्या मेहुण्यांनी त्यांना टांग्याची व्यवस्था करून दिली. व ते शिर्डीस आले. त्यावेळीं मीही शिर्डीसच होतों. त्यांची माझी मशीदींतच गांठ पडली. मी त्यांनां "आल्या सारखे एक दिवस रहा" म्हटलें परंतु टांगा लवकरच परत जावयाचा असल्याकारणानें त्यांनां राहतां येईना; त्यांनीं परत जाण्याची इतकी उत्कट इच्छा दर्शविल्यावर आम्हीं बाबांच्याकडे गेलों व बाबांनी त्यांनां जाण्याला परवानगी दिली; व अगदीं लवकर जा असें सांगितलें. ते एक मैल गेले नाहींत तोंच पाऊस सपाटून आला, परंतु चमत्कार हा कीं, ते मुळींच भिजले नाहींत व त्यांच्या अंगांत जरी एक सदरा व पांढरा आंगरखा इतकेंच होतें तरी थंडी वाऱ्यापासून सुद्धां बिलकूल त्रास झाला नाहीं.

( ३५ )

मी एकदां शिरडीस असतांना श्रीसद्‌गुरु साईबाबांनीं दोन प्रहरीं "प्रधान आले का" म्हणून विचारलें. मी 'आले नाहींत' म्हणून उत्तर दिलें. व त्यांना बोलवावयाचे काय म्हणून विचारलें. त्यावर बाबा "बरें" इतकेंच बोलले. ज्या दिवशीं बाबांनीं वरील प्रश्न विचारून प्रधानांचें स्मरण केलें त्या दिवशीं रा. रा. प्रधान[१] मुंबईस हायकोर्टांत वकील लोकांच्या बसावयाच्या खोलीमध्यें एकाएकीं घेरी येऊन निचेष्ट पडले. निचेष्ट पडतां पडतां त्यांना बाबांचें स्मरण झालें. त्यांनां असे निचेष्ट पडलेले पाहतांच इतर वकील मंडळी धांवत आली व त्यांनीं सावध करण्याचा प्रयत्न चालविला. परंतु ते आपोआप सावध झाले. थोडया वेळानें त्यांनां मोटारनें घरीं पोंचवितों असें मंडळी म्हणूं लागली. परंतु तसें करण्याचें कारण नाहीं, मी आतां बरा आहे असें त्यांनींच मित्र मंडळीला आश्वासन दिलें व त्यांचे मित्र रामदत्त विठोबा देसाई व रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर ह्यांनीं त्यांस रेलवेनेंच घरीं नेलें. दुसरे दिवशीं बाळा शिंपी नांवाचा एक शिर्डीकर भक्त त्यांचेकडे श्रीसद्‌गुरु साईबाबांची उदी घेऊन गेला व माझेंही त्यांना बाबांनी आपली आठवण काढली होती अशा मजकुराचें पत्र आलें. गुरु माउली भक्तांच्या संकट निवारणार्थ कशी धांव घेते, ह्याचें हें एक उदाहरण आहे.

१ मोरेश्वर विश्वनाथ प्रधान.

## रा. रा. वि. सी. मुल्हेरकर यांचें पत्र.

सन्मान्य रा. रा. अण्णा साहेब दाभोळकर यांचे सेवसी-विनायक सिताराम मुल्हेरकर याचा अनेकवेळां कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. आपले कडोन "श्री साईलीला" मासिक पुस्तकाचे अंक १ ते ४ बुक पोष्टानें आलें त्यांचा अंतःकरणपूर्वक स्वीकार करून श्री बाबांचें चरणी शिरसाष्टांग नमस्कार घातला. पुस्तकांकडे अवलोकन करितां प्रत्येक अंकीं श्री सद्गुरु साईबाबांची मुर्ति अधिष्टित झालेली पाहून अत्यंत परमानंद झाला व प्रत्यक्ष बाबा मज गरीबास दर्शन देण्यास अतिशय कृपालोभ भरून माझें घरीं चालून आले अशी ह्या देहाची कायमची भावना झाली आहे. मला ते अंक घेऊन केव्हां वाचीन अशी उत्कंठा झाली व त्या प्रमाणें एकदां सर्व अंक घाईघाईनें वाचले तरी ते पुन्हां किती वेळा वाचावे लागतील वाचले जातील तरी मनाची तृप्ती होणार नाही असें झालें. मला श्रीसद्गुरू साईबाबा यांचा अनुभव आला व प्रथमारंभी काय घडलें ती हकीगत सादर करीत आहें; तिचा सानंद स्वीकार व्हावा व तींत योग्य ती आपले कडून दुरुस्ती होऊन महाराजांचे लीलेखालीं तिची मासिकाचे एकाद्या अंकांत प्रसिद्धि व्हावी.

सन १९१० मध्यें मी वांद्रें येथें एका ठाणे फारेष्ट डिव्हीजनचा हेडक्लार्क होतों. तेव्हां मी लोअर परेलहून वांद्रे येथें डेली प्यासेंजर ऑफीसला जाण्याकरितां येत असें. अशा वेळीं वांद्रे येथील माझी बरीच स्नेही मंडळी श्री बाबांचे दर्शनास शिर्डीस जात व ते परत येत तेव्हां बाबांची प्रासादिक उदी व दुसरे कांहीं जिन्नस आणीत व केव्हां केव्हां मला उदी व प्रसाद देत व कांहीं स्नेही मंडळी माझे कपाळीच उदी लावीत. मी जरी तिचा स्वीकार करीं तथापि माझे अज्ञानामुळें व अल्प समजुतीमुळें मी त्यांस म्हणत असें कीं, माझा ह्या गोष्टीवर कांहीं भरंवसा नाही. आणखी म्हणत असें कीं, बाबांनी माझे मनांत प्रेरणा केल्याशिवाय मी त्यांचे दर्शनास जाणार नाहीं. अशा स्थितीमध्यें माझे बरेच दिवस लोटले व पुष्कळ

भक्त मंडळी जाऊन बाबांच्या अतर्क्य लीलांचे वर्णन करूं लागून त्यामुळें मुंबई, वांद्रे, वसई, विरार, आगाशी, डहाणू, उंबरगाव इकडून बरीच मंडळी शिर्डीस दर्शनार्थ जाऊं लागली तथापि माझें मत जें ठाम होतें कीं, श्री बाबांनीं प्रेरणा केल्याशिवाय जावयाचें नाही तें कायमच होतें. परंतु कांही दिवसांनी असा योग आला कीं, मला गुरुवारी उपोषण असतें अशा एका दिवशीं रात्रीं मी माझा नित्यक्रम आटोपून झोपो गेलों. सकाळी उठतांच अशी एकदम भावना उत्पन्न झाली कीं आज बाबांकडे जावयाचें. अगोदर पहाटेच्या प्रहरीं उपोषणामुळें कांहीं साक्षात्कार झाला तो कोणते स्वरूपांत झाला तो मात्र मला व्यक्त करतां येत नाहीं. सकाळीं उठून लागलाच चहा घेऊन तसाच सकाळचे आठ वाजतां वांद्रे येथें ऑफीसांत येऊन कांही महत्वाचें व जरुरीचे कागदांवर साहेबांच्या सह्या घेऊन ठेविल्या. त्यांस रजेचे विचारतांच "बरें आहे तुम्हांस ३।४ दिवसांची रजा दिली आहे, तावडतोब जाऊन या, चांगली गोष्ट आहे," असें ते म्हणाले इतकेंच नव्हें तर "मलाही नाशिकला एका नातेवाईकास भेटण्यांस जावयाचें आहे तेव्हां मीही तुझे बरोबर येऊन आपण एकाच गाडीनें जाऊं" असें ते म्हणाले. घरी परत ११ वाजतां आलों कुटुंबास कळविलें कीं, "आज बाबांची प्रेरणा एकदम झाली आहे, मी दोनप्रहरचे गाडीला जाणार" तेव्हां जा म्हणून तावडतोब सांगितलें. तथापि लांबीचा पल्ला, तो प्रांत कधीं पाहिला नाही, सोबत कोणी नाही, ओळख नाही, थंडीचे दिवस इतक्या गोष्टी जरी कुटुंबाच्या म्हणण्या प्रमाणें खऱ्या होत्या तरी मनांत जी प्रेरणा झाली त्यामुळें असल्या गोष्टीकडे लक्ष न देतां एकदम गुरुवारचें पारणें सोडून निघालों. गाडींत बसलों व सकाळीं कोपरगावचे स्टेशनवर उतरलों. शीर्डीस जाण्याचा रस्ता तांगा वगैरे बद्दलची चौकशी करतो तों त्याच गाडींत माझे मित्र डाक्टर मिस्तर आर. आर. चौबळ हे उतरले. दोघांची भेट होताच दोघांनां श्री साईबाबाकडे जावयाचे असल्या कारणानें जास्तच आनंद झाला. श्री गोदावरीचे तीरावर तांगा येतांच दुसरे लहानपणींचे माझे परम मित्र रा. गजाननराव कणेकर हे तेथें त्या वेळीं सबजडज्य होते त्यांनीं तांग्याचा तपास करितांच आपल्या शिपायास कळविलें कीं, लवकरच जा आणि तो चाललेला तांगा आपला

आहे व त्यांतील पाहुणे मंडळी आपल्याकडे घेऊन ये. लागलाच तांगा त्यांचे बंगल्यावर आला व त्यांनी आम्हांस पाहातांच त्यांस फारच आनंद झाला व "गंगा आली आळशावरी ॥ आळशी पळे दुरी दुरी" असें म्हणून लागलीच सामानसुमान उतरवून घेऊन येथेंच रहावें असा अत्याग्रह करूं लागले. अखेर चहा पाणी थोडा अल्प आहार करून त्यांस मोठ्या मिनतवारीनें कळविले कीं, "आम्ही श्री साईबाबांचे दर्शनाकरितां आलों आहोंत. आम्हाला फार लवकर गेलेंच पाहीजे, व आरतीचे वेळीं महाराजांचे दर्शन व्हावे अशी पूर्ण आशा धरून आम्ही आलों आहोंत तेव्हां आम्हांस रहातां येत नाही." नंतर त्यांचा निरोप घेऊन जों निघालों तों आरतीचे पूर्वीं अर्धा पाऊण तास आधीं येऊन पोहोंचलों व श्रीमंत काका साहेब दीक्षित ह्यांचे वाड्यांत उतरलों तेथें. त्यांचे दर्शनाचा लाभ झाला व सर्व व्यवस्था आमची त्यांनीच केली व लागलेच आरतीस हजर झालो. श्रीचे दर्शन होतांच इतका आनंद झाला कीं तसा पूर्वीं कधींच झाला नव्हता. इतकेंच नव्हे तर बाबांचे पायावर डोकें ठेवतांच त्यांचे तोंडून निघालेले उद्गार ऐकून तर फारच आश्चर्यचकीत झालों. "तुला इकडे येण्यास माझी प्रेरणा तुझे मनांत व्हावयास पाहिजे होती नाहींरे" ह्या वरून माझें मनांत जी गोष्ट घोळत होती ती दर्शन होतांच सांगितली. या वरून बाबा पूर्ण अंतर्साक्षी आहेत अशी खात्री पटून मी पुन्हां साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां मजकडे कृपादृष्टीनें अवलोकन करून माझे अंगावरून हात फिरवून साईबाबा मला ऊठ म्हणून म्हणाले. त्याच वेळीं डाक्टर चौबळ ह्यांनीही दर्शन घेतलें. ते व मी आरती नंतर आम्हांस पुण्यास जावयाचें होतें म्हणून आज्ञा घेण्यास गेलों होतों. त्या वेळीं श्री बाबांनी डाक्टरांस विचारलें कीं, "आमचा वांद्रें येथें भक्त आहे तो आपलें औषध घेत आहे त्याचा ताप कसा आहे तो बरा आहेना?" असा प्रश्न केला. चौबळ हे डाक्टर आहेत व ते वांद्रें येथें आहेत हें माहित नसतां त्याजपाशी आपले शिष्याची हकीगत बाबा विचारतात हें पाहून डॉक्टर ह्यांस फारच आश्चर्य वाटलें. तेव्हां श्री बाबा हे पूर्णावतारी आहेत अशी आमची त्यांनी खात्री करून दिली. ह्या प्रमाणें

प्रथम दर्शनाच्या लाभाचा अनुभव आला. ह्या वरून ते भक्तांचे पूर्ण कनवाळू होते व त्यांस प्रत्येकाचें मनोगत कळत असून त्याचा अनुभव बोलण्यांत दाखवीत. मी शिर्डीस जावयास निघते वेळी माझ्या कुटुंबानी ज्या हरकती दाखविल्या होत्या त्या खऱ्या असें जरी मला प्रथमारंभी वाटलें तरी कोणतीही अडचण न येतां दर्शनाचा लाभ झाला.

दुसरा अनुभव:— माझें कुटुंब नेहमी म्हणे कीं तुम्ही बरेच वेळ शिर्डीस जाऊन आलात एकदा मला घेऊन चला. म्हणून एकदां कुटुंब व दोन तीन मुलें घेऊन श्री बाबांचे दर्शनास गेलों. तेव्हां माझे कुटुंब दर्शनास गेल्यावेळीं जिकडे बऱ्याच स्त्रिया बसल्या होत्या त्यांत जाऊन बसल्या. बसतांच बाबांनी त्या सर्व स्त्रियांना एकाचे संसाराची दिनचर्या सांगितली ती माझे कुटुंबास इतकी पटली कीं,ती आणि आमच्या दिनचर्येंत अणू एवढा फरक नव्हता त्यामुळें माझे 'कुटुंबास इतका आनंद झाला कीं, तो वर्णन करितां येणें शक्य नाहीं. व पुढें कसें वागावें ह्याचाही त्यांना पूर्ण उपदेश मिळाला. त्यांची बाबांवर भक्तिहि दृढ झाली; कांही झालें तरी बाबांना विचारा व ते सांगतील त्या प्रमाणें करा असें म्हणें. म्हणून एकदां एका मुलीचे लग्नाचे बाबतीत बाबांस विचारतां त्यांनीं सांगितलें कीं, "जी योजना करतां तीच उत्तम आहे व तेंच कायम होईल व ती मुलगी सुखानें नांदेल. त्याप्रमाणें मुली त्याच मुलास देण्याचें ठरवून ती आपलें संसारी सुखानें नांदत असून उत्तम प्रकारचे सुखांत आज मितीस आहे. त्यावेळीं श्री बाबांनी तिचे मस्तकावर हस्त ठेवून तिला आशिर्वाद दिला होता त्याची मला आज पूर्ण आठवण आहे.

तिसरा अनुभव-एकदा मी शिर्डीस गेलों तो पंढरपुरचे रस्त्यानें जाऊन श्रीपांडुरंगाचे दर्शन घेऊन गेलों. त्यावेळीं तेथें पंढरपुराचे महाद्वाराजवळ एक पेढे मिठाई वगैरेचें दुकान होतें. मी त्या दुकानीं पेढे घेतांना दुकानदारास म्हटलें होतें कीं, "मला शिर्डी येथें श्रीसाईबाबांचें दर्शनास जावयाचें आहे तेव्हां त्यांचे पुढें ठेवण्याकरितां तुमच्याकडे जे अति उत्तम पेढे असतील त्यांतून सवा शेर पेढे दे. त्यानें खरोखर उत्तम

दिले. शिर्डीस दुसरे दिवशीं श्री बाबांचे दर्शनास गेलों तेंव्हां पेढयाचा पुडा पुढें ठेवतांच बाबांनीं विचारलें. "हे पंढरपुरचे पेढे आहेतना? माझे करितां आणिलें आहेस नां?" मी प्रत्युत्तर केलें "होय आपले करतांच आणिले आहेत त्याचा आपण स्वीकार केलात तर उपयोग. 'होय माझे करतांच आणिलेस' असें म्हणून लागलीच एकदोन पेढे स्वीकारून बाकीचे पेढे "श्रीपांडुरंगाचा प्रसाद" म्हणून मला दिले तेंव्हां पंढरपुरचेच पेढे कशावरून म्हटले ह्या वरून ते पूर्ण अंतर्ज्ञानी होते व भक्तांची इच्छा पूर्ण करीत असत यांत कोणत्याही प्रकारचा संशय नाहीं. व ही दयाघन मूर्ती मनांत येऊन तिज बद्दल दिवसें दिवस प्रेम वृद्धिंगत होत गेलें.

ज्या ज्या वेळीं शिर्डीस श्रीं बाबांचे दर्शनास यावें त्या त्या वेळीं नवाच चमत्कार व्हावा. दोन महिन्यानीं चार महिन्यानीं मी शिर्डीस जाण्याचा क्रम ठेविला होता; परंतु कधींही मला एक दिवस जाण्यास हरकत आली नाहीं.

चवथा अनुभवः—एकदां मी व श्रीमंत कै. रा. नानासाहेब चांदोरकर असे शिर्डीस जाण्याकरितां निघालों. कोपरगावांस उतरून श्री गोदावरीचे तीरीं स्नान करून, गोदावरीचे पात्रांत त्यांचे ब्राह्मणानें चहा केला होता तो, आम्ही दोघांनीं घेतला. त्या वेळीं नानासाहेबानीं ५ शेर दूध घेतलें होतें व तिथें आमचे बरोबर बरीच ब्राह्मण व इतर मंडळी मुंबईहून आलेली होती ती पण आमचे बरोबरच गोदावरीचीं स्नानें करून आपल्या बायकां मुलांस चहा व दूध पाण्याची व्यवस्था करीत होती. नानासाहेबांनी जें दूध घेतलें होतें तें त्या मुलांकरितां वाटण्याची सुरूवात केली तेव्हां स्त्रिया व मुलें ह्यांनी "आह्माला दूध आम्हाला दूध" असें गडबड करून त्यानां अगदी भंडावून एकच गडबड केली. मी नाना साहेबांच्या शेजारींच त्यांची तयार असलेल्या टांग्यांत बसण्या करितां वाट पहात होतों कारण आम्हा दोघांचा एक टांगा होता म्हणून मी त्या मंडळीस म्हणालों त्यांना असा त्रास देऊं नका, ते आमच्याकडे डिस्त्रीक्ट डेपुटी कलेक्टर

आहेत व साईबाबांचे पक्के भक्त आहेत. ते इतर यात्रेकरू प्रमाणें नाहीत. पुढें श्रीमंत कै. नानासाहेब व मी टांग्यांत बसलों व आरतीचे वेळेस शिर्डीस जाऊन पोहचलों. आरती झाल्यानंतर बाबांचे पायीं डोकें ठेवतांच बाबा मजकडे पाहून ह्मणाले " कायरे नाना माझा पक्का भक्त आहे आणि तूं काय कच्चा आहेस ?" हें ऐकून मी मोठा चकित झालों कीं, मी जे श्री गोदावरीचें पात्रांत यात्रेकऱ्यांजवळ म्हटलें होते कीं, " नानासाहेब हें साईबाबांचे पक्के भक्त आहेत" त्याची चटकन् आठवण झाली. ह्या वरून श्रीबाबा अंतर्साक्षित्वाचा अनुभव पावलोपावलीं कसा दाखवित असत हें स्पष्टच होत आहे. शिवाय अनुभवामृत पाजून आपल्या भक्तांस अहंकार उत्पन्न होऊं देत नसत. अहंकाराचा वारा न लागो राजसा ॥ माझ्या विष्णुदासा भाविकांसी ॥ ह्या श्री संत नामदेवाच्या वाणी प्रमाणें श्रीसाईबाबा भक्तांस गोष्टीचे रूपानें तऱ्हतऱ्हेचा प्रेमाचा उपदेश करीत असत.

ह्या प्रमाणें अनुभव येत येत आज पर्यंत श्रीबाबांच्या कृपेनें ह्या संसार सागरांत दिवस जात आहेत. संत चरण लागतां सहज ॥ वासनेचें बीज जळोनजाय ॥ ह्या श्री तुकारामांचे उक्ती प्रमाणें हें होत आहे.

आह्मी मात्र श्री संताचें चरणीं श्री तुकोबाचे खालील अभंगाप्रमाणें अंतःकरण पूर्वक आपला विश्वास ठेविला पाहीजे.

चंदनाचे हात पायही चंदन ॥ परिसा नाहीं हीन कोण अंग ॥
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधःकार ॥ सर्वांगे साखर अवघी गोड ॥
तुका म्हणे तैसा सज्जनापासून ॥ पहातां अवगुण मिळेचिना ॥

असो पत्र विस्ताराची माफी असावी, वेडें वाकडें लिहून पाठवीत आहें त्यास आपल्या मासिकांत स्थळ मिळावें. कृपालोभ असावा हे विज्ञापना.

आपला,

विनायक सिताराम मुल्हेरकर.

Extract from letter dated 27th June 1921 from Profesor G. G. Narke M. A. to Mr. Kaka Sahib ( H. S. Dikshit B. A. LL. B )

" Yesterday in the evening I had been to the Mali Maharaj as suggested in Mr. Khaparde's letter. I am very glad went there. We had a talk about Shree also.

श्री साईमहाराज फार मोठे साधू होते असें ते म्हणाले. ते आणखी म्हणाले."माझ्याकडे एक बामण आला होता तो महाराजांची निंदा करीत होता." मी विचारलें "अरे झालें तरी काय ?" तो म्हणाला " साधू काय कोठें वाईट साईट शिव्या देत असतात! शिरडींत मी मशिदीचे पायरीवर बसलों होतों, तेव्हां महाराजांनीं फाटकाजवळ त्यांचेकडे दर्शनास दुरून आलेल्या एका महाराच्या बाईस आचकट विचकट शिव्या दिल्या." माळी महाराज म्हणाले "अरे बाबा तुला साधूच्या क्रिया समजत नाहींत.तुला चमत्कार पहावयाचा आहे काय? त्या शिवींत तर महाराजांनीं त्या बाईला पाहिजे होती ती देणगी दिली. जा ती बाई * * * * गांवीं आहे. ती मूल मागण्या करितां बाबांकडे गेली होती व तिला महाराजांचे कृपेनें मूल झालें आहे जा पाहून ये. "

| जमा | रुपये | आणे | पै |
|---|---|---|---|
| गेल्या वर्षाची शिल्लक | ८८८ | १३ | ६ |
| कोठी खातें जमा | १३८६ | ५ | ६ |
| मासिक वर्गणी खातें जमा | १५८२ | ७ | ६ |
| वार्षिक वर्गणी खातें जमा | ६५६ | ४ | ० |
| पेटी खातें जमा | ७३० | ६ | ९ |
| कायम फंडखातें जमा | ३७०९ | ४ | ९ |
| एकंदर रुपये. | ८९५३ | १० | ० |

मी वरील जमाखर्चाचा आढावा तपासला आहे, तो बरोबर आहे.

J. K. Parulkar

सर्टिफाइड् ऑडिटर.

मुंबई ता. २६ आगष्ट १९२३

## १८४४ चा जमाखर्चाचा आढावा.

| नावें | रुपये | आणे | पै |
|---|---|---|---|
| दक्षिणा खातें नावें | ३१३ | ० | ० |
| कोठी खातें नावें | १२२८ | ० | ६ |
| पूजा खर्च खातें नावें | ११३ | १५ | ३ |
| भोजन खर्च खातें नावें | ३३३ | ६ | ९ |
| तसळमात खातें नावें | ५२ | ३ | ९ |
| घोडा खातें नावें | १६७ | ९ | ० |
| धुणी सर्पण खातें नावें | ६६ | १४ | ३ |
| नंदादीप खातें नावें | १९१ | ० | ० |
| मशीद रखवालदार खातें नावें | ११२ | ८ | ६ |
| रोषनाई खर्च खातें नावें | २८३ | ४ | ९ |
| वाजंत्री खातें नावें | २४० | ० | ० |
| मशीद देव्हारा खातें नावें | ५० | ४ | ६ |
| शिर्डी किरकोळ खातें नावें | १४६ | २ | ६ |
| पगार खातें नावें | १२९ | १२ | ० |
| स्कीमसंबंधी खातें नावें | १६४ | २ | ६ |
| मुंबई ऑफ़िस खातें नावें | ७१ | ३ | ० |
| अमानत खातें नावें | १२६ | ० | ० |
| इंपीरीयल बँक खातें नावें | ३७२ | १५ | ० |
| स्थावर दुरुस्ती खातें नावें | २६ | ० | ० |
| स्थावर मिळकत खातें नावें | ५ | ० | ० |
| संस्थान भांडीं खातें नावें | १५,० | ६ | ६ |
| दामोदर घन:शाम बाबरे इस्टेट खातें नावें | ३०७ | ० | ० |
| शामराव रामचंद्रराव जयकर खातें नावें | २० | ० | ० |
| कायम फंडासाठी रु. २५०० व रु. १००० चे बाँड घेतले त्याचे दिले त्या नावें | ३५,५४ | १ | ० |
| शिल्लक वर्ष अखेर | ७२८ | १२ | ३ |
| एकंदर रुपये | ८९५३ | १० | ० |

हरि सीताराम दीक्षित, चिटणीस

G. R. Dabholker खजिनदार

### श्रीसद्गुरू साईनाथ प्रसन्न.

# श्री शिर्डीसंस्थानचा पहिला वार्षिक रिपोर्ट.

श्री शिर्डीसंस्थानाच्या व्यवस्थे संबंधीं योजना अहमदनगर डिस्ट्रिक्ट कोर्टाकडून ता. १३।२।२२ रोजीं मंजूर झाली. त्यानंतर लवकरच डिस्ट्रिक्ट कोर्टाचे नाझर रा. रा. पारखे यांनी शिर्डीस येऊन सर्व सामानासह इस्टेटीचा कबजा रा. रा. तात्या गणपतराव पाटील कोते यांस त्यांच्या व इतर ट्रस्टींच्या तर्फे दिला. श्री शिर्डी संस्थान कमिटीची व ट्रस्टींची नेमणूक वरील योजनेमध्येंच झाली होती. संस्थान कमिटीची पहिली सभा रामनवमीचे दिवशीं म्हणजे तारीख ६-४-२२ रोजीं झाली. त्यावेळीं श्री समर्थांच्या भक्तांना भक्त मंडळाचे सभासद होण्यासाठीं विनंतिपत्रें छापून पाठवावीं असें ठरलें, व त्या पत्राचे मसूदे कमिटीनें त्या सभेंत मंजूर केले. तसेंच कायम फंड व मासिक वर्गणी गोळा होण्यासाठीं भक्तांना छापील पत्रें पाठवावीं असेंही ठरून त्या पत्राचाही मसूदा मंजूर करण्यांत आला. त्या ठरावाप्रमाणें कमिटीला माहित असलेल्या महाराजांचे भक्तांना छापील पत्रें पाठविण्यांत आलीं. त्याचा परिणाम आजपर्यंत झाला आहे, तो खालीं लिहिलेल्या आंकड्यावरून व्यक्त होईल.

भक्त मंडळाच्या सभासदांची संख्या २२२. त्यांनीं कबूल केलेल्या वर्गणीची वार्षिक रक्कम रु.४०२० [ त्यापैकीं आतांपर्यंत वसूल झालेली रक्कम रु. २२३८॥=॥ ].कायम फंडांत देऊं केलेली रक्कम रु. २१९,७९ ( त्यापैकीं आतांपर्यंत वसूल झालेली रक्कम ३७०९।-॥।- )

वरील योजना जरी सन १९२२ मध्यें झाली, तरी संस्थानच्या कोठीची स्थापना कांहीं वर्षे अगोदर, म्हणजे सन १९१६ मध्यें झाली होती. आणि वेळोवेळीं मंडळीकडून वर्गणी येत असे आणि ती संस्थानच्या खर्चासाठीं उपयोगांत आणली जात असे. त्यावेळच्या हिशोबाच्या वह्या आहेत. पण खतावण्या पूर्णपणें न झाल्यामुळें आढावा काढला

गेला नाही. त्या खतावण्या तयार करण्यासाठीं व आढावा काढण्यासाठीं एक सबकमिटी नेमण्यांत आली होती. व या कामासाठीं ७५ रुपये पर्यंत खर्चण्याची त्यांना मंजूरी देण्यांत आली होती. त्याप्रमाणें त्या सब कमिटीनें तें काम रा. रा. बापाजी बळवंत देशपांडे यांजकडे सोंपवलें आहे आणि तें लवकरच पुरें होईल असें वाटतें.

२. रामनवमीचे दिवशीं महाराजांची मोठी तसबीर मशिदींत ठेवण्यांत आली. आणि ती नीट सुरक्षित रहावी अशा हेतूनें योग्य ती व्यवस्था करण्याचा अधिकार कमिटीनें चिटणीसांस दिला. व खर्चासाठीं १०० रुपयांची मंजूरी दिली. विचारांतीं असें ठरलें कीं, एक लाकडी देव्हारा करवून त्यांत ती तसबीर बसवावी. त्याप्रमाणें देव्हारा करविला, आणि तसबीर त्यांत बसंविली आहे. या कामीं खर्च रुपये झाला तो रु. ९३-१४-६.

३. त्याचप्रमाणे श्रीसमर्थांच्या जिनसांची योग्य व्यवस्था व विल्हेवाट करण्यासाठीं एक सब कमिटी नेमण्यांत आली होती, त्या सब कमिटीनें सर्वानुमतें असें ठरविलें कीं, श्रीसमर्थांची पायघडयांची बनात आणि दुसऱ्या कांही जिनसा ज्यांना कसर लागत चालली होती, त्या विकून टाकाव्या. त्याप्रमाणें त्या विकल्या गेल्या, आणि त्या विक्रीपासून रुपये ५९०८= उत्पन्न झालें, ती रक्कम कायम फंडांत जमा केली. या वस्तू विकण्याचें मुख्य कारण असें कीं, त्या विकल्या नसत्या तर कसर लागून लवकरच त्या नामशेष झाल्या असत्या. त्यांत विशेष महत्वाची वस्तु म्हणजे महाराजांच्या पायघडयांची बनात. तिच्यासंबंधानें असें ठरवले होतें कीं, महाराजांच्या भक्तांकडून जितक्या मागण्या येतील (प्रत्येक मागणीबरोबर दोन रुपये दिले पाहिजेत अशी अट घातली होती) तितके तिचे भाग करून प्रत्येक मागणीदाराला त्याने केलेल्या मागणीप्रमाणें भाग मिळावा. असें केल्यानें प्रत्येकानें आपआपला भाग, महाराजांचे पवित्र चरण लागल्यामुळें फार सांभाळून ठेवला आहे.

४ महाराजांच्या इतर वस्तू म्हणजे कपड्याच्या घड्या, चिलिमी, जोडा या मशिदीतच ठेविल्या आहेत. गाद्या, तांब्या, पितळेची भांडी, चांदीची भांडी उंची कपडे हें सर्व सामान मंदिरांत म्हणजे जेथें महाराजांची समाधि आहे त्या इमारतींत ठेविलें आहे. किरकोळ सामान चावडीत ठेविलें आहे.

५. महाराज लेंडीवर जात असत ती लेंडीची जागा रा. रा. मोरेश्वरराव प्रधान यांनीं रा. रा. तात्या गणपती पाटील यांच्या नांवानें घेऊन संस्थानाला बक्षिस दिली आहे, व त्या संबंधी बक्षिसपत्र लवकरच होईल. तसेंच गांवठाणाचे हद्दींत असलेली जागा रा. रा. हरि सिताराम दीक्षित यांची व त्यावर श्री. गोपाळ मुकुंद बुटी यांनीं बांधलेले इमले सदर दीक्षित आणि सदर श्री. बापूसाहेब बुटी यांचे चिरंजीवांनीं संस्थानाला बक्षीस दिले आहेत. तें बक्षिसपत्रही लवकरच होईल.

६ श्री समर्थांच्या समाधीचें काम संगमरवरी दगडाचें करण्याचें व सभामंडपांत फरशी करण्याचें श्री. बापूसाहेब बुटी यांच्या चिरंजीवांनीं ठरविलें आहे, व त्याप्रमाणें काम लवकरच सुरू करण्यांत येईल.

७ श्री साईनाथ सगुणोपासनेचीं पुस्तकें आजपर्यंत नामदार गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे छापवीत असत. त्या पुस्तकांच्या प्रती संपल्यामुळें त्यांची व मुळ प्रसिद्धकर्ते कृष्णशास्त्री भीष्म यांची संमती घेउन त्या पुस्तकाची नवी आवृत्ती काढावयाची कमिटीनें ठरविलें व त्याप्रमाणें तीं पुस्तकें छापवून तयार आहेत. पहिल्या आवृत्तीपेक्षां दुसऱ्या आवृत्तींत कांहीं पदें जास्त घातलीं आहेत.

८ कमिटीनें चावडीची जागा आणि राधाकृष्णा आई राहत होत्या तें घर आणि महाराजांचा घोडा बांधला जातो तें घर, दुरुस्त करण्याला मंजुरी दिली होती. पैकीं राधाकृष्णा आईचें घर दुरुस्त झालें व दुसऱ्या घरांची दुरुस्ती लवकरच हातीं धरण्यांत येईल.

## कमिटीनें खर्चाचें बजेट मंजूर केलेलें होतें तें खालीं लिहिल्या प्रमाणें

| | रुपये. | | रुपये. |
|---|---|---|---|
| पूजाखर्च | १५० | मशीद रखवालदार | १५० |
| भोजनखर्च | ३६० | श्रीची दक्षिणा | ३६५ |
| घोडाखर्च | २०० | दुरुस्ती खर्च | ६४० |
| नंदादीप | २५० | किरकोळ | १५० |
| रोषणाई | २२५ | तसलमात | १८० |
| धुणीसर्पण | १०० | मुंबई ऑफिसखर्च | ४० |
| पगारखर्च | १५० | | |
| वाजंत्री | २४० | एकूण रुपये. | ३२०० |

तीन हजार दोनशें

संस्थानचा जमाखर्चाचा आढावा जो रा. रा. जिवाजी कृष्ण परुळकर सर्टीफाईड ऑडिटर यांनीं तपासून पास केला आहे, तो या सोबत जोडला आहे. त्यावरून असें दिसून येईल कीं, फक्त २ बाबीमध्यें बजेटापेक्षां झालेला खर्च ज्यास्ती आहे. त्या दोन बाबी येणें प्रमाणें:—

रोषणाई खर्च बजेट रु. २२५-झालेला खर्च रु. २८३।-॥;-

मुंबई ऑफिसखर्च बजेट रु. ४०-झालेला खर्च रु. ७१॥=

कांहीं इतर खर्चांत बजेटपेक्षां खर्च कमी झाल्यामुळें शिल्लक राहिली, त्यांतून वर लिहिलेला ज्यास्त झालेला खर्च भागवावा म्हणजे रीअप्रोप्रियेशन करावें असें कमिटीनें तारीख २८-३-२३ च्या सभेमध्यें ठरविलें आहे. तसेंच त्या सभेंत शके १८४५ चें बजेट पास करतांना रोषनाई खर्चाची रक्कम रु.३०० आणि मुंबई ऑफिसच्या खर्चाची रक्कम

२०० ठरवली आहे. शके १८४४ च्या बजेटमध्यें महाराजांच्या भक्तांना वर कलम १ मध्यें लिहिलेली छापिल पत्रें पाठवण्यासंबंधाच्या खर्चाची बेगमी केली नव्हती. पण या कामाला कमिटीची मंजूरी असल्यामुळें योग्य तो खर्च करण्यांत आला आणि त्या खर्चाचा आंकडा रुपये १६४८=॥ आहे. आढाव्यामध्यें कोठी खात्यांत नांवेच्या बाजूला रुपये १२२८८८॥ खर्च दाखविला आहे. वास्तवीक इतका खर्च झालेला नाहीं. कोठी खात्यांतल्या खर्चाच्या रकमांचा तपशील पाहिला तर असें आढळून येईल कीं फक्त १९२।=॥ रुपये कोठी खात्यांतून खर्च झाले. ती रकम कायम फंडांत भरण्यासाठीं संस्थान कमिटीनें ता. ८-७-२२ रोजीं मंजुरी दिल्याचें वर नमूद झालेंच आहे. याशिवाय बाकीच्या खर्चाच्या रकमा म्हणजे कायम फंड थोडया दिवसा साठीं उसने दिलेले रुपये ५८४८/ आणि इतर कांहीं खात्यांत खर्ची पडावयाच्या रकमा कोठीखात्यांत खर्ची पडल्या होत्या त्या कोठीखात्यांत जमा करून निरनिराळ्या खात्यांत खर्ची घातल्या आहेत. तसेंच संस्थानासाठीं ३ कढया घेण्याची व त्यासाठीं १५० रुपये खर्चण्याची कमिटीनें ता।. १-१०-२२ रोजी मंजूरी दिली. त्याप्रमाणें ती रक्कम खर्ची पडली आहे, पण वास्तवीक शके १८४४ मध्यें एकच कढई तयार होऊन हातीं आली आहे आणि बाकीच्या दोन कढया तयार होऊन शके १८४५ मध्यें आल्या आहेत. एकंदर तीन कढयांची किंमत रेल्वे व इतर खर्चासह रुपये १८६।-॥। झाली. अर्थात मंजूर झालेल्या रकमेपेक्षां जो ज्यास्त खर्च झाला आहे त्याबद्दल कमिटीची मंजूरी घेण्यांत आली.

१० महाराजांचे एक भक्त दामोदर घनशाम बाबरे यांनीं मृत्यूपत्र करून आपले इस्टेटीचा कांहीं भाग शिर्डी संस्थानला दिला आहे. त्या मृत्यूपत्राचे एक्झीक्युटर रा. रा. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान, गोविंद रघुनाथ दाभोळकर, लक्ष्मण गणेश महाजनी, हरी सिताराम दीक्षित आणि डहाणूचे वकील रा.रा. अच्युत नारायण खरे हे आहेत त्या मृत्यूपत्रासंबंधानें प्रोबेट डयूटी भरण्यासाठीं संस्थानाच्या शिलकेंतून रुपये २०७ दिले आहेत. अर्थात ईस्टेट एक्झीक्यूटरांच्या हातांत आली म्हणजे त्या इस्टेटींतून ही रक्कम वसूल होईल. ही रक्कम आढाव्यामध्यें नमूद केली आहे.

११ वरील आढाव्यामध्यें संस्थानच्या मुख्य चार उत्सवांचा जमाखर्च आलेला नाहीं. या उत्सवांची व्यवस्था खालीं लिहिलेल्या मंडळीकडे असते, आणि तूट आल्यास तेच भरून काढतात. खर्च जाऊन शिल्लक राहिल्यास त्या त्या उत्सवाचे खातीं जमा होते.

१ रामनवमी:—ह. भ. प. दासगणू महाराज व तात्या पाटील.

२ गुरुपौर्णिमा:—श्री. बुटी.

३ गोकुळ अष्टमी:—रा. रा. तात्या पाटील.

४ पुण्यतीथि:—मुंबईकर मंडळी.

आजपर्यंत पुण्यतिथी शिवाय करून बाकीचे उत्सवांत तूटच पडत गेली. पुण्यतिथी उत्सवासंबंधानें मात्र दरवर्षी खर्चापेक्षां वर्गणी जास्त येत गेली. शके १८४४ च्या आरंभीं पुण्यतिथी फंडाची शिल्लक रुपये ९३८॥-॥। होती व त्यांतून रुपये ५०० कायम फंडांत भरावें असें ठरल्यावरून ती रक्कम कायम फंडांत भरली गेली.शिवाय कायम फंडांतून २५०० रुपयांचा सरकारी नोटा घेण्यासाठीं कोठी फंडातून कायम फंडांत १९२।=॥ वालवें असें कमिटीनें ठरविल्यावरून ती रक्कमही कायम फंडांत भरली गेली. त्यानंतर अमळनेरचे श्री. प्रतापशेट यांजकडून रुपये १००० ची देणगी आल्यामुळें आणखी रुपये१०००ची सरकारी नोट घेण्यात आली. एकूण कायम फंडाच्या रुपये ३५०० च्या नोटा आहेत. आतां कायम फंड यापेक्षां पुष्कळच जास्ती म्हणजे सुमारें एक लक्ष रुपये झाला पाहिजे त्यासाठीं महाराजांच्या भक्तांनी मनोभावानें प्रयत्न केल्यास तें काम सहज होईल आणि असें ते करतील अशी दृढ आशा प्रदर्शित करून हा पहिल्या वर्षाचा म्हणजे शके १८४४ चा रिपोर्ट पुरा करतों.

दासगणू अध्यक्ष.

हरि सताराम दीक्षित. चिटणीस

## शिर्डी येथील श्री गोकुळअष्टमीचा उत्सव.

महाराज समाधिस्थ झाल्यावर शिर्डी येथील वार्षिक उत्सवाची जी व्यवस्था करण्यांत आली, त्यांत गोकुळअष्टमीचा उत्सव रा. तात्या गणपतराव पाटील कोते यांचेकडे सोंपविण्यांत आला. त्याप्रमाणें प्रतिवर्षी रा. तात्या व त्यांची शिर्डीकर मंडळी तो उत्सव थाटानें करीत आली व यंदाचा उत्सव तर त्यांनीं फारच थाटानें साजरा केला. महाराज समाधिस्थ होण्यापूर्वी थोडी वर्षेंच या उत्सवास सुरुवात झाली होती. जन्मकाल रात्रीं असल्यामुळें, गोकुळ अष्टमीची रात्र जर महाराजांच्या चावडीच्या दिवशी आली तरच कृष्णजन्म त्यांचे समोर चावडींत केला जात असे. महाराजज्या रात्रीं मशिदींत असत त्या रात्रीं कांहीं ठराविक मंडळीशिवाय इतरांचा जाण्याचा परिपाठ नसल्यामुळें व त्यारात्रीं मशिदींत वाद्यें वगैरे वाजविण्याचा रिवाज नसल्यामुळें, तेथें कृष्ण जन्मोत्सव साजरा करणें शक्य नव्हतें.

विशेषें करून या उत्सवात, पूर्वीपासूनच सप्ताह, भजनी दिंडया व मोठा भंडारा इकडेंच ज्यास्ती लक्ष दिलें जात असे. त्या प्रमाणें यंदाचें सालींही ठिकठिकाणच्या भजनी दिंडयानां निमंत्रणें पाठवून दिंडया बोलावल्या होत्या. व खालीलप्रमाणें निरनिराळया गांवच्या दिंडया समारंभास आल्या होत्या. नाऊर, नांदुर, सावखेडें, गोंडगांव, वीरगांव, पढेगांव, लाडगांव, पुरणगाव, अंदरसोल, कोकमठाण, ओतरें, लाख, मातुळठाण, पुणतांबे, नारायणपुर, पिंपळवाडी, शिंगवें, भेरडापुर, खुरसानगांव, पाथरें, मांजरी, राहातें, व चिंचपुरी ही सर्व गांवे शिर्डीच्या आसपासचीं आहेत. या लहानशा गांवातून गांवकरी लोकांची भजनी मंडळीची दिंडी असून उत्सवाचे प्रसंगी आजूबाजूचें गावांतून निमंत्रण आल्यास तेथें जाऊन उल्हासानें उत्सवांत भाग घेऊन तो ते साजरा करितात. याची शहरवासी लोकानां फारच थोडी कल्पना असेल. बहुतेक ठिकाणीं दिंडी बरोबर वारकरी संप्रदायाचें कीर्तन करणारे हरिदास असतात व त्यांची कीर्तनेंही फार चांगलीं होतात. या कीर्तनकारांचें तुकाराम महाराजांचे अभंग, ज्ञानेश्वरी एकनाथी भागवत या ग्रंथांचें पाठांतर वाखाणण्यासारखें असतें, व अभंगाच्या अनुरोधानें भक्ति

मार्गाचा प्रसार करण्याकडे यांचा सर्व भर असतो. यंदाचे उत्सवास ह. भ.प. मारुतिबुवा राहतेकर, बाबुराव बुवा औरंगाबादकर, व्यंकट स्वामी पुणेकर, आप्पाजी बुवा मातुळठाणकर, गंगाराम बुवा, नानासाहेब कोकमठाणचे महाजन बुवा, पिंपळवाडीचे भिमाजी बुवा सुतार व भिकचंद बुवा यानीं हजर राहून आठही दिवस सकाळ संध्याकाळ कीर्तनें करून उत्सवाला फार शोभा आणली होती. उत्सवास खालील प्रमाणें प्रमुख मंडळी मुद्दाम आली होती. आण्णाजी पाटील, नारायण पुरकर, नारायण पाटील मातुळठाणकर, बाळाजी पाटील, गोंडेगावकर, त्रिंबक पाटील लोणीकर, रावसाहेब कृष्णराव शिंदे वारीकर, गंगागीर महाराजांचे शिष्य एकनाथबुवा वांजरगांवकर, चांगदेव महाराजांचे वंशज यमाजी पाटील शिंगवेकर.

सप्त्याची सुरुवात मंगळवार श्रावण वद्य द्वितीयेपासून करण्याचें ठरलें होतें. सोमवार रात्रींपर्यंत ज्या दिंडया येऊन पोंहोंचल्या होत्या त्यांचा अदमास पाहून सप्त्याची वाटणी खालील प्रमाणें केली होती:—

| दिवसाचा व रात्रीचा प्रहर | दिंडया. |
|---|---|
| १ ला प्रहर | —नाऊर, नांदुर, सावखेडें |
| २ रा प्रहर | —गोंडेगांव, वीरगांव, पढेगांव, लाडगांव. |
| ३ रा प्रहर | —धोतरे, लाख. |
| ४ था प्रहर | --मातुळठाण, पुणतांबे, नारायणपुर, पुरणगांव, अंदरसोल, कोकमठाण. |

ज्या मंडळीकडे दिवसाचा जो प्रहर होता त्यांचेकडे रात्रीचा तोच प्रहर दिला होता. मंडळीचा जमाव बराच मोठा असल्यामुळें समाधी पुढील सभामंडप अपुरा होता. म्हणून सप्ताह मशिदीपुढील सभामंडपांत उभा केला होता. सप्त्यांची सुरुवात मंगळवारीं सकाळीं सूर्योदयाबरोबर झाली. व तेव्हांपासून समाप्तीपर्यंत आठी प्रहर सारखा निदान २५ तरी टाळ पडत असे. या प्रमाणें सारखा नामाचा व भजनाचा गजर ७ दिवस

अखंड चालू होता. कित्येक वेळां तर येवढा मोठा जमाव जमत असें की भजनाचा गजर रात्रीचें शांत वेळी अर्ध्या मैलावर ऐकूं येत असे. वरील सात दिवसांत शिर्डी माझें पंढरपूर । साई बाबा रमावर ॥ या दासगणु महाराजकृत अभंगाची साक्ष सर्वांस तंतोतंत पटली. आषाढी कार्तिकीला पंढरपूर जसें गर्जत असतें त्याच प्रमाणें भजनाचा गजर शिरडीस चालू होता. पंढरपुरास चंद्रभागेचें वाळवंटांत जशी वारकरी संप्रदायीं लोकांची कीर्तनें होतात तशींच शिरडीस समाधिगृहा पुढील पटांगणांत सकाळ संध्याकाळ कीर्तनें चालूं होतीं व श्रोतृवृंदांचीं अंतःकरणें भक्तिरसानें उचंबळत होतीं.

सोमवारी अष्टमीचें रात्रीं जन्माचें कीर्तन समाधी पुढें करणें अवश्य असल्यामुळें त्याप्रमाणें तें समाधी पुढील सभामंडपांत ह. भ. प. आप्पाजी बुवा मातुळठणकर यांनी केलें व कृष्णनामाचे घोषांत कृष्णजन्म केला. अर्थात् सभामंडपांत फारच थोडया मंडळीचा समावेश होणें शक्य होतें म्हणून समाधिमंदिरा पुढील पटांगणांत दुसरें कीर्तन उभें करण्याचें ठरलें व तेथें ह. भ. प. मारुतीबुवा यांचें तीन तास सुश्राव्य कीर्तन झालें.

दुसरें दिवशीं म्हणजे मंगळवारीं नवमीचे सकाळीं सूर्योदयाला सप्त्याची समाप्ती झाली व त्याच संध्याकाळीं गोपाळकाला झाला. रात्रीं रथाची मिरवणूक निघाली ती सावकाश मिरवित मिरवित पहाटें चार वाजतां परत आली.

उत्सवा प्रीत्यर्थ आलेल्या सर्व मंडळींचा रोजचा भोजन खर्च गांवकरी मंडळींनीं आपआपसांत वांटून घेतला होता. सोमवार श्रावण वद्य १ च्या संध्याकाळ पासून निमंत्रित मंडळी येऊं लागली. सोमवार रात्रीचा खर्च तात्या पाटलानीं संभाळला. मंगळवारचा सर्व खर्च बाळा बापु जगताप यांनी संभाळला. बुधवारचा खर्च रा. बळवंतराव पुणेकर यांनीं घेतला होता. गुरुवारचा सर्व खर्च सखाराम महादु कोते यांनीं संभाळला. शुक्रवारचा मगनीराम नंदराम मारवाडी यांनीं सभाळला. शनिवारचा नारायण गणपत शेळके यांनीं संभाळला. रविवारचा राहत्याचे धनराज व

दीपचंद मारवाडी यांनीं सांभाळला. सोमवारच्या खर्चासाठीं रा. बापुराव पुणेकर यांनी एक उक्ती रकम दिली आणि त्याशिवाय लागणारा खर्च तात्या पाटलानीं केला.

मंगळवारीं सार्वजनिक भंडारा झाला. उत्सवाचें सुरुवातीपासून प्रति दिवशी मंडळींचा जमाव वाढतच गेला. पहिल्या दिवशीं सुमारें २५० पान जेवून उठलें. दुसरे दिवशीं ३५०, तिसरे दिवशीं ६००, चौथे दिवशीं ९००, पांचवे दिवशीं १२००, सहावे व सातवे दिवशीं २००० या प्रमाणें रोज पानें वाढत जाऊन अन्न संतर्पण चालू होतें. शेवटच्या दिवशीं भंडाऱ्याला तर सुमारें १२००० पान जेवून उठलें. भंडाऱ्याचा प्रसाद घेण्याचें मुक्तद्वार ठेवलें होतें व जात गोताचा कांहीं विचार न ठेवतां जो येईल त्याला जेवण घालण्यांत आलें. भंडाऱ्याकरितां निरनिराळ्या भक्तांकडून द्रव्याच्या किंवा धान्याच्या रूपानें मदत आली त्याचा सविस्तर उल्लेख हिशोबांत येईल व तो योग्य वेळीं छापला जाईल. सारांश महाराजांचे कृपेनें उत्सव करणाऱ्या मंडळीनें स्वतः पुष्कळ झीज सोसून व अंगमेहनत करून हा उत्सव मोठ्या थाटानें साजरा केला हें लिहिण्यास आम्हांस फार आनंद होतो.

# श्री साईनाथ पद्यावळीः—

( सौ० रंगूबाई विरचित पद नं० १ )

साईनाथ मना स्मर दिन रजनी ॥ धृ० ॥

वास जयांचा शिरडी ग्रामीं ॥ परंतु असती स्थिरचर व्यापुनी ॥ अनुभव घ्यावा अपुलाले मनीं ॥ जय जय जय साईनाथ मना स्मर दिन रजनी ॥ १ ॥ रूप तयांचें येतां ध्यानीं ॥ मन हें थेई कितितरी दाटुनी ॥ चरण धरावे धांवत जाउनी ॥ जय जय जय० ॥२॥ पातक नाशक नाम जयाचें ॥ ध्यातां गातां आवडी साचें ॥ चुकतील फेरे चौऱ्यायशींचे ॥ जय जय जय० ॥३॥

( सौ० कृष्णाबाई हिनें रचिलेलें पद नं० २ )

साई नमितें तव पायां ॥ येऊंद्या आमुची दया ॥धृ०॥ करुनी कृपेची छाया ॥ आम्हां तारी तारी प्रभुराया ॥ चाल ॥ सुखकर तव पदरजसेवाया पदरीं झडकरि घ्या दीना या ॥ नच अव्हेर करी गुरुराया ॥ स्तवितें स्तवितें तव पायां ॥ येऊंद्या आमुची दया ॥१॥ अनंत नामें तव गाया ॥ मति दे मला प्रभुराया ॥चाल॥ जगदोद्धारक साई गुरुराया ॥ अगम्य महिमा तव ऐकुनिया ॥ हृदय हें गेलें ओथंबुनिया ॥ नेई नेई तव पाया ॥ येऊंद्या आमुची दया ॥२॥

( दास गणु छात्र दामूअण्णा यानी रचिलेलें पद नं० ३ )

जगीं नाहीं तुजविण कोणी जगपाला साईरे ॥ मत्तापा वारीरे ॥ भवभय पाशा तोडीरे ॥ जगीं नाहीं० ॥१॥ भव सागरीं मी ही नौका नावाडी तूंचि रे ॥ काळजी वाहीरे मम नौकाही तारीरे ॥ गणु छात्राचा रुसवारे ॥ धरिसी मनीं तूं जरी थोडारे ॥ जवरी करुनि तव धरिन चरण ममहरण करिन दुरिता सारे ॥ जगीं० ॥२॥

# अध्याय ९ वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरुभ्योनमः ।
श्रीकुलदेवतायैनमः । श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ।
॥ श्रीसद्गुरुसाईनाथायनमः ॥

आतां पूर्वकथानुसंधान । न होतां बाबांचें अनुज्ञापन ॥
भक्त निजठाया जातां परतोन । कैसे ते शीण पावत ॥ १ ॥
तैसीच बाबांची भैक्ष्यवृत्ती । आनिर्वाणांत जी सेविली होती ॥
ती पंचसूनादि पापनिवृत्ती । कल्याणार्थी भक्तांच्या ॥ २ ॥
तैसेंच आब्रम्हस्थावरांत । साईच सर्वत्र अनुस्यूत ॥
साईच होऊनि कृपावंत । भूतीं भगवंत हें ठसवी ॥ ३ ॥
म्हणवूनि सकळ श्रोतेजन । प्रार्थितों मी श्रवणाग्रधान ॥
सादर परिसतां या कथा पावन । कृतकल्याण पावाल ॥ ४ ॥
शिरडीच्या यात्रेचें हें एक लक्षण । बाबांची अनुज्ञा जाहल्यावीण॥
यात्रेकरू परततां जाण । करी तो आमंत्रण विघ्नांतें ॥ ५ ॥
तीच एकदां आज्ञा होतां । शिरडींत येईना क्षण एक वसतां ॥
वसतां चढलेंच विघ्न माथां । अनुभव समस्तां आहेच ॥ ६ ॥
आज्ञेबाहेर जे जे वागले । तयांचे वाटेंत हाल झाले ॥
कितीएकांस चोरांनीं लुटिलें । स्मरण राहिलें जन्माचें ॥ ७ ॥

भाकर तुकडा खाऊन जा म्हणतां। कोणी उपाशीच घाईनें* निघतां।
गाडी न मिळतां उपाशीं रखडतां। अनेक भक्तांहीं पाहिलें ॥८॥

एकदां पाटील तात्या कोते। कोपरगांवास चालले होते ॥
आठवड्याचा बाजार तेथें। जाहले येते मशीदी ॥ ९ ॥

टांगा ठेविला उभा करून। घेतलें बाबांचें दर्शन ॥
चरण वंदिले येतों म्हणून। हें आज्ञापन मिष केलें ॥ १० ॥

---

* एकदां तात्यासाहेब नूलकरांची व भाऊसाहेब दीक्षितांची मंडळी शिर्डीहून निघणार होती. महाराज त्यांस म्हणाले 'उद्यां सकाळीं जा व कोपरगांवाहून जेवून जा' त्यांनीं त्याप्रमाणें तयारी केली व कोपरगांवचे खाणावळींत तयारी ठेवण्याविषयीं निरोप पाठविला. पण कोपरगांवास पोहोंचलें तेव्हां जेवण तयार नव्हतें आणि गाडीची वेळ जवळ आल्यामुळें न जेवतां तसेच स्टेशनावर गेले. तेथें पाहिलें तों गाडीला दीड तास उशीर होता. मग गांवांत टांगा पाठवून टांगेवाला ब्राह्मण होता त्याचे हातीं खाणावळींतून जेवण आणविलें व ती सर्व मंडळीं स्टेशनावर जेवली. जेवल्यावर दहा मिनिटांनीं गाडी आली. आतां याच्या उलट नमुना पहा.

एकदां रा. रा. रघुवीर भास्कर पुरंदरे आपल्या सर्व मंडळीसह महाराजांचें दर्शनास गेले होते. येतानां त्यांच्या आईच्या आग्रहावरून त्यांनी नाशकास जाण्याची परवानगी मागितली. महाराज म्हणाले " जा दोन दिवस रहा आणि पुढें जा" त्याप्रमाणें सर्व मंडळी नाशकास गेली. त्याच दिवशीं त्यांचे धाकटे भावास अतिशय ताप भरला. सर्व मंडळी घाबरली व मुंबईस तावडतोब निघून जावें असें म्हणूं लागली. त्यांचे उपाध्येही तसेंच म्हणूं लागले. पण पुरंदरे म्हणूं लागले. " महाराजांनीं दोन दिवस राहावयाचें सांगितलें आहे, तर दोन दिवस झाल्याशिवाय मी यथून हलणार नाहीं." मग नाईलाज होऊन सर्व मंडळी राहिली. दुसरे दिवशीं भावाचा ताप आपोआप गेला व तिसरे दिवशीं मंडळी मुंबई येथे सुखरूप येऊन पोंहोचली.

भक्त करीत टाळाटाळ । बाबा जाणत वेळ अवेळ ॥
पाहोनि तात्या उतावीळ । म्हणती अमंळ थांबावें ॥ ११ ॥
राहूं दे होईल बाजार । जाऊं नको गांवा बाहेर ॥
परी पाहून तात्याचा आग्रह फार । म्हणाले बरोबर शामा ने ॥ १२ ॥

काय शाम्याचें आहे कारण । केलें तया आज्ञेचें अवगणन ॥
बैसले तात्या टांग्यांत जाऊन । बाजारालागून चालले ॥१३॥
दोहों घोड्यांत एक चपळ । रुपये तीनशेचें पाठबळ ॥
साऊळ विहीर येतां जवळ । अति उच्छृंखल चाललें ॥ १४ ॥

कधीं न खाणारा चाबूक फटका । बाजारा जाणारा न भरतां घटका॥
घोडा पडला कंबरेंत लटका । भरला टचका एकाएकीं ॥ १५ ॥
कैचा बाजार कैचें काय । तात्यास आठवली साई माय ॥
वेळीं ऐकतों टळता अपाय । नाहीं उपाय मत गोष्टी ॥ १६ ॥

ऐसेंच आणीक एकदां घडलें । तात्या कोल्हार गांवां निघाले ॥
टांगा जोडून पुसाया आले । वंदिलीं पाउलें बाबांची ॥ १७ ॥
आतां जाऊन येतों म्हणाले । पूर्णानुमोदन नव्हतें मिळालें ॥
तथापि तात्या तैसेच निघाले । परिसा वर्तलें काय पुढें ॥ १८ ॥
टांगा आधींच तो भिरक्याचा । बेफाम भरधांव उधळला साचा ॥
पाही न वाट खळगे खाचा । जिवावरचा प्रसंग ॥ १९ ॥

असो तो साईकृपेनें टळला । टांगा बाभुळीवर आदळला ॥
बरें झालें तेथेंच मोडला । दगा वटावला पुढील ॥ २० ॥

ऐसाच एक मुंबापुरस्थ । आंग्लभौम थोर गृहस्थ ॥
मनीं धरोनि कांहीं हेत । आला दर्शनार्थ साईच्या ॥. २१ ॥

होता चांदोरकरांचा वशीला । पत्र लाविलें माधवरावाला ॥
तंबू एक माखूनि घेतला । निवास लाघला सुखाचा ॥ २२ ॥

बाबांचिया इच्छेविरुद्ध । म्हणेल कोणी चढेन मशीद ॥
परतेन दर्शन घेऊनि स्वच्छंद । अशक्य हें प्रसिद्ध सर्वत्र ॥ २३ ॥

यत्न केला तीन वेळां । मशीदीसी चढावयाला ॥
परी तो सर्व निर्फळ गेला । पाहुणा हिरमुसला मनांत ॥ २४ ॥

इच्छा होती तयाचे मनीं ॥ मशीदींत वरती जाऊनी ॥
वंदावें बाबांस गुढघे टेकुनी । हस्त चुंबूनी बैसावें ॥ २५ ॥

इच्छा तयांची ऐसी । बाबा न येऊं देत तयांसी ॥
मशीदींत बैसावयासी । अपुलें पाशीं तेधवां ॥ २६ ॥

खालींच सभामंडपीं असावें । तेथेंच पाहिजें तरी बैसावें ॥
दर्शन घेणें तेथूनि घ्यावें । परी न यावें वर तेणें ॥ २७ ॥

असो पुढें तो निघे जावया । अंगणीं आला निरोप घ्यावया ॥
जासील उदयीक म्हणती तया । घाई कासया ही इतुकी ॥ २८ ॥

लोकांहीं बहुत कथिलें । नानापरी तयां विनविलें ॥
परवानगी न होतां जे गेले । वहु पस्तावले म्हणवूनी ॥ २९ ॥

होणारापुढें कांहीं न चले । नाहीं तयांच्या मना तें पटलें ॥
परवानगी विरहीत निघाले । हाल जाहले मार्गांत ॥ ३० ॥

गाडी आरंभीं नीट चालली । पुढें घोड्यांनीं वाट सोडिली ॥
साऊळ*विहीर मात्र ओलांडिली । तों पुढें आली बायसिकल ॥ ३१ ॥

---

* शिर्डीपासून हें ठिकाण सुमारें दीड मैलावर आहे.

गृहस्थ होता मागें बसला । पुढें तांगा एकाकीं चमकला ॥
तोल जाऊनि तैसाच कलथला । मागें उलंडला मार्गांत ॥ ३२ ॥
महत्प्रयत्नें तांगा थांबविला । गृहस्थ घसरत घसरत गेला ॥
मग उचलून तांग्यांत बसविला । तांगा हाकिला पुढारा ॥ ३३ ॥
शिरडी राहिली एकीकडे । मुंबई राहिली दुसरीकडे ॥
कोपरगांवी आस्पीटल जिकडे । तांगा मग तिकडे घेतला ॥ ३४ ॥
असो कांहीं दिवस तेथ । गृहस्थ पश्चात्तापव्यथित ॥
होते अवज्ञा प्रायश्चित्त । भोक्तृत्व भोगीत पडले ते ॥ ३५ ॥
ऐसे असंख्य अनुभव आले । लोक सहजीं शंकूं लागले ॥
बाबांची आज्ञा पाळूं सरले । करूं न धजले अव्हेर ॥ ३६ ॥
कोण्या गाडीचें *चक्र निसटलें । कोण्याचें तें घोडें थकलें ॥
गाड्या चुकले उपाशीं राहिले । चुरमुरें फांकिले किती एकीं॥३७॥
तीच आज्ञा जयांनीं वंदिली । अवेळींही गाडी साधिली ॥
मुशाफरीही सुखाची झाली । आठव राहिली जन्माची ॥३८॥

---

* हा अनुभव तर खुद या चरित्रलेखकाचा आहे. हा एकदां आरंभीं आरंभीं मुलें बाळें व कुटुंबासह श्रीसाईंचे दर्शन घेऊन "भाकर तुकडा खाऊन दुपारानंतर परत जावयास जा" असें साईबाबा म्हणाले असतां तिकडे दुर्लक्ष करून घाईधाईनें बैलगाडीनें स्टेशनचे वाटेस लागला असतां व आगगाडीची वेळ साधावी म्हणून गाडी भरधांव काढली असतां बैलगाडीचें डावीकडील चाक एकाएकीं निसटून गटारांत जाऊन पडलें. दैव थोर म्हणून गाडी मोडली नाहीं व कोणी दगावलें नाहीं.पण तें चाक आणून व्यवस्थितपणें बसवून गाडी पुन्हा सुरू होई तों आगगाडीची वेळ निघून जाऊन कोपरगावीं खाणावळींत उतरून जेऊन मग दुसऱ्या गाडीनें त्याला मुंबईस जाणें भाग आलें.

वर्षोनवर्षे भैक्ष्यवृत्ति । रुचावी कां बाबांमती ॥
ऐसें आलिया कोणाचे चित्तीं । शंकानिवृत्ती अवधारा ॥ ३९ ॥

पाहूं जातां बाबांचे आचरित । भिक्षाच मागणें तयांतें उचित ॥
आनंद देई साधी निजहित । साधी गृहस्थ कर्तव्य ॥ ४० ॥

कायवाचा चित्तवित्त । साईपदीं जो समर्पित ॥
ऐसा जो साईचा अनन्यभक्त । आवडे अत्यंत साईस ॥ ४१ ॥

जें जें अन्न पाके आश्रमीं । स्वामी तयाचा गृहस्थाश्रमी ॥
यती आणि ब्रह्मचर्याश्रमी । यांसी होमी प्रथमता ॥ ४२ ॥

न देतां आधीं तयां अवदान । स्वयें गृहस्थ जें करी सेवन ॥
आचरूं लागे चांद्रायण । शास्त्र निर्बंधन त्रिशुद्धि ॥ ४३ ॥

यती ब्रह्मचारी यांप्रती । निषेधिलीसे पाकनिष्पत्ति ॥
ते करूं जातां चांद्रायण माथीं । आदळे निश्चिती तयांच्या ॥४४॥

म्हणवूनी तयांची उदरपूर्ति । शास्त्रें निरविली गृहस्थावरती ॥
यती कधींही न उद्यम करिती । कराया भरती पोटाची ॥४५॥

बाबा नव्हेत गृहस्थ । किंवा नव्हेत वानप्रस्थ ॥
केवळ ब्रह्मचारी बाळ संन्यस्त । भिक्षाच प्रशस्त तयांसी ॥ ४६ ॥

अखिल विश्व माझें घर । मीच वासुदेव विश्वंभर ॥
मीच परब्रह्म अक्षर । हा दृढबोध निर्धार जयाचा ॥ ४७ ॥

भिक्षान्नाचा पूर्ण अधिकार । तया विश्वकुटुंबियासचि साचार ॥
इतरांचें विडंबन प्रकार । चव्हाट्यावर पहावे ॥ ४८ ॥

आधीं त्यजावी पुत्रैषणा । मग वित्तैषणा लोकैषणा ॥
जो एषणात्रय निर्मुक्त जाणा । तेणेंच भिक्षाशना इच्छावें ॥४९॥

नातरी 'भिक्षापात्र अवलंबणें। जळो जिणें लाजिरवाणें' ॥
महाराज तुकोबाचें गाणें। अर्थाविणें हें निःसार ॥ ५० ॥
साई समर्थ महान सिद्ध। लहान थोरां हें तों प्रसिद्ध ॥
परी आम्हीच सदां आज्ञाबद्ध। असम्बद्ध सत्पदीं ॥ ५१॥
पंचमहायज्ञावीण । गृहस्थास जें नित्य जेवण ॥
तें शिरडींत रोज पवित्र भोजन। स्वयें करवून घे साई ॥ ५२ ॥
प्रत्यहीं पांच घरें जाई। अतिथि यज्ञाचें स्मरण देई ॥
भाग्यवान हा लाभ घेई ॥ आपुलें गेहीं बैसून ॥ ५३ ॥
सारूनियां जे पंचमहायज्ञ। अवशिष्टान्न करिती सेवन ॥
अज्ञात पंचसूना पापगहन। तयांचें निर्दहन तेणेंनी ॥ ५४ ॥

---

(१) वेदाध्ययन हा ब्रह्मयज्ञ. हा शिरडींत रोज चाले. भक्तांच्या अधिकारानुरूप महाराज हे कोणाकडून उपनिषदें तर कोणाकडून गीता भागवतादि ग्रंथ वाचवून घेत. उदाहरणार्थः- कै. वा. बाळुकाका कडून सभामंडपांत भगवद्गीता आणि हैद्राबादचे एका शास्त्र्याकडून दिवसा भागवत आणि रा. रा. बझे यांचेकडून रात्रीं एकनाथी भागवत वाचवीत. रा. ब. साठे साहेबांचे वाड्यांत रा. रा. बापुसाहेब जोग आणि रा. रा. भाऊसाहेब दीक्षित यांचे वाड्यांत खुद्द दीक्षितांला हीं कामें सोपविली होतीं: ते दोघे आणि कै. वासी बाळासाहेब भाटे यांचे हस्तेंही हा यज्ञ होत असे.

स्वधाकारानें पितरांस आणि स्वाहाकारानें देवांस आहुती देणें हा पितृ आणि देवयज्ञ.

भूतांना बलिदान हा भूत यज्ञ आणि अतिथींना भोजनदान हा मनुष्य यज्ञ.

बाबा या भूत आणि मनुष्य यज्ञासाठीं रोज ५।७ घरें स्वतः भिक्षा मागत आणि आलेल्या यात्रेकरूकडे इतर अन्नार्थी अतिथीसाठीं माध्यान्ह जेवणकाळीं कोणाकडून तरी झोळी फिरवीत.

कंडणी चुल्ली पेषणी । उदकुंभी आणि मार्जनी ॥
हीं पंचसूना या नांवानीं । आहेत जनीं प्रसिद्ध ॥ ५५ ॥

उखळीं धान्यदाणा घालुनी । वरी मुसळाचे घाव हाणुनी ॥
तूस कोंडा टाकिती काढुनि । होते न जाणूनी जीव हिंसा॥ ५६॥

पडेना तें धान्य पचनीं । प्रयोग इतुका जाहल्यावांचुनी ॥
म्हणोनि हें पंचसूनाग्रणी । पाप कंडणी या नांव ॥ ५७ ॥

चुलीस सर्पण लांकडें लाविलीं । तेणें पाकनिष्पत्ती झाली ॥
तेथेंही नकळत जीवहत्या घडली । त्या नांव चुल्ली पाप दूजें ॥५८॥

घेउनी जातें वा जातणी । पिष्ट करितां धान्याचें कोणी ॥
न कळत असंख्य जीवांची हानि । होते त्या पेषणी हें नांव ॥५९॥

वापीकूप तडागा मधुनी । कुंभ घेउनी आणिती पाणी ॥
किंवा नरनारी धुतां धुणी । असंख्य प्राणी मरतात ॥ ६० ॥

साधावया कुंभ स्वच्छतें । घांसतां वा उटतां हातें ॥
अनिच्छा जी हत्या घडते । पाप चौथें उदकुंभी ॥ ६१ ॥

तैसेंच शीतोष्ण उदकें स्नान । करूं जातां सदा संमार्जन ॥
जीवहत्या घडे जी दारुण । मार्जनी जाण त्या नांव ॥ ६२ ॥

या पंच पापनिर्मुक्तीस । पंचमहायज्ञ गृहस्थास ॥
होतां पंचसूना निरास । चित्त शुद्धीस लाधे तो ॥ ६३ ॥

चित्तशुद्धीचें हेंचि वळ । शुद्धज्ञान उपजे सोज्वळ ॥
ज्ञानानंतर मोक्ष अढळ । पावती सकळ भाग्याचे ॥ ६४ ॥

असो हें साईचें भैक्ष्यव्रत । लिहितां लिहितां वाढला ग्रंथ ॥
परिसा एक कथा अन्वर्थ । अध्याय समाप्त करूं मग ॥ ६५ ॥

प्रेम असावें मात्र चित्ता । कोणाहि सवें कांहींही धाडितां ॥
जाहली जरी तया विस्मरणता । बाबा न विसरतां मागत ॥ ६६॥
असो भाजी, भाकर, पेढा । भक्तिभाव असावा गाढा ॥
भेटतां ऐसा भक्त निधडा । साईस उभडा प्रेमाचा ॥ ६७ ॥
ती एक प्रेमळ भक्ताची कथा । ऐकतां आनंद होईल चित्ता ॥
कोणीही स्वीकृतकार्यीं चुकतां । बाबाच रस्ता लाविती ॥ ६८ ॥
ऐसी ही गोड शिक्षण पद्धती । योग्यवेळीं देती जागृती ॥
धन्य भाग्याचे जे हे अनुभविती । आनंदस्थिती अवर्ण्य ॥ ६९ ॥
भक्तश्रेष्ठ रामचंद्र नाम । वडील जयांचे आत्माराम ॥
तर्खड जयांसी उपनाम । विश्राम धाम साई जयां ॥ ७० ॥
परी जेणें नित्य संबोधन । ते बाबासाहेब तर्खड जाण ॥
तेणेंच ही पोथी चालवूं आपण । नाहीं कारण या परतें ॥ ७१ ॥
साई प्रेमें उचंबळून । तर्खड जैं जात ओथंबून ॥
करु लागती अनुभव कथन । काय तें श्रवण सुखकर ॥ ७२ ॥
काय तयांचें भक्ति विभव । पदोपदीं साईचे अनुभव ॥
एकामागून एक अभिनव । सरसाविर्भाव जैं कथिती ॥ ७३ ॥
बाबासाहेब अतुल प्रेमी । साईची आलेख्य प्रतीमा धामीं ॥
भव्य चंदनी देव्हारा नामी । पूजन कामी त्रिकाळ ॥ ७४ ॥
तर्खड मोठे पुण्यवान । पुत्रही पोटीं भक्तिमान ॥
साईस नैवेद्य समर्पिल्यावीण । करीना अन्नग्रहण तो ॥ ७५ ॥
करूनिया प्रातःस्नान । कायावाचामनें करून ॥
करीं नित्य छबीचें पूजन । नैवेद्य समर्पण भक्तीनें ॥ ७६ ॥
हा तयाचा नित्य क्रम । असतां चालला अविश्रम ॥
जाहला सफल परिश्रम । अनुभव अनुत्तम लाधला ॥ ७७ ॥

माताही साईची परम भक्त । शिरडीस जाऊं झाली उत्सुक्त ॥
मुलानें मार्गांत तिच्या समवेत । असावें हा हेत वडिलांचा॥७८॥
इच्छा तियेसीं शिरडीस जावें । समर्थ श्रीचें दर्शन घ्यावें ॥
तेथेंच कांहीं दिवस क्रमावे । चरण सेवावे प्रत्यक्ष ॥ ७९ ॥
ऐसा जरी वडिलांचा हेत । जाणें नव्हतें मुलाचे मनांत ॥
कोण मागें पूजा घरांत । करील नियमित ही चिंता ॥ ८० ॥
वडील प्रार्थनासमाजिष्ट । तयांस मूर्तीपूजेचे कष्ट ॥
देणें कैसें होईल इष्ट । कोडें हें प्रकृष्ट मुलाला ॥ ८१ ॥
तरी जाणोनि तयांचें मनोगत । चिरंजीव प्रयाणीं उद्यत ॥
प्रेमपुरःसर वडिलांस विनवीत । काय ती मात परिसावी ॥८२॥
साईस नैवद्य केल्याविणें । घरीं कोणीही अन्न न सेवणें ॥
हें इतुकें मान्य केलियाविणें । घटेना जाणें निश्चित ॥ ८३ ॥
हें मुलाचें नित्यव्रत । वडिलांस होतें आधींच अवगत ॥
'जा मी करीन नैवेद्य नित । राही तूं निश्चित' वदती ते ॥ ८४ ॥
'आधीं न करितां साईसमर्पण । न करूं कोणीही अन्नग्रहण' ॥
'हें माझें वचन मानी प्रमाण । न करी अनमान जा स्वस्थ' ॥८५॥
प्राप्त होतां हें आश्वासन । मुलगा शिरडीस करी प्रयाण ॥
पुढें उगवतां दुसरा दिन । करिती पूजन तर्खड स्वयें ॥ ८६ ।
बाबासाहेब तर्खडांनी । पूजनारंभींच दुसरे दिनीं ॥
आलेख्यप्रतिमे सन्मुख येऊनी । लोटांगणीं प्रार्थियेलें ॥ ८७ ॥
मुलगा जैसी पूजा करी । तैसीच बाबा माझी चाकरी ॥
असावी कवाइत न घडावा मजकरीं । प्रेम अंतरीं द्या मातें ॥ ८८ ॥
ब्राह्म मुहुर्तीं स्नान करून । ऐसें प्रार्थनापूर्वक पूजन ॥
तर्खड करूं लागले प्रतिदिन । नैवेद्य समर्पण समवेत ॥ ८९ ॥

शिर्डी येथील

श्रीसद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हें पुस्तक मूळ वे० सं० कृ० आ० भीष्म यांनी शके १८२३ त तयार केलें होतें. सांप्रत त्याची सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ति छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाल आरतीचे वेळीं म्हटलीं जागारीं पद्यें, व भजनकाळी म्हणावयाजोगीं सदर शास्त्री भीष्म यांनी तयार केलेलीं पद्ये, परापूजा व मानसपूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्तकाची किंमत दोन आणे ठेविली आहे.

हरि सिताराम दीक्षित

पुस्तक मिळण्याचें ठिकाण—श्री. साईलीला ऑफीस.

रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर.

५ टर्नर रोड, बांद्रे.

चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी

शिर्डी., पो. राहते, जि. अहमदनगर.

---

# आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवि दासगणू महाराजांचीहि प्रेमळ व प्रासादिक आख्यानें देतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री. पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाऊणपट किंमतींत पुस्तक मिळेल.

एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फो. सह ३। रु.

ग. अ. सराफ, नांदेड.

---

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ४०२ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनी छापून रा. आ. तर्खड यांनी ५ टर्नर रोड बांद्रे येथें प्रसिद्ध केलें.

नैवेद्यार्थ शर्करा खंड । बाबासाहेब अर्पीत अखंड ॥
ऐसा नियम चालला उदंड । पडला त्या खंड एकदिनीं ॥ ९० ॥
व्यवहार व्यापृत अंतःकरण। तर्खडांस नाहीं राहिलें स्मरण ॥
होऊनि गेलें सर्वांचें भोजन । नैवेद्याविण एके दिनीं ॥ ९१ ॥
एका मोठ्या गिरणीवरी । तर्खडसाहेब मुख्याधिकारी ॥
तदर्थ प्रातःकाळचे प्रहरीं । जाणें बाहेरी नित्य त्यां ॥ ९२ ॥
पुढें मग दुपार भरतां । बाहेरून परत येतां ॥
पूर्वनिवेदित शर्करा प्रसादता । भोजनीं बसतां पावतते ॥ ९३ ॥
ऐसा नियम चालतां । पडलें एकदां विस्मरण चित्ता ॥
राहिली शर्कराखंडनिवेदनता । प्रसाद ग्रहणता अंतरली ॥ ९४ ॥
करावया बैसतां भोजन । शर्कराशेष स्वैंपाकिण ॥
पात्रीं वाढी अनुदिन । तीच कीं जाण अन्नशुद्धि ॥ ९५ ॥
परी ते दिवशीं पूजा समयीं । होऊन कांहीं तरी घाई ॥
शर्करा नैवेद्य राहून जाई । प्रसाद ठायीं पडेना ॥ ९६ ॥
त्याच वेळीं पात्रावरून । तर्खड अनुतापयुक्त होऊन ॥
साईप्रतिमा अभिवंदून । साश्रु नयन बोलत ॥ ९७ ॥
बाबा ही काय माया दाविली । कैसी मजला भूल पाडिली ॥
कवाईतचि मजकरीं घडविली । क्षमा व्हावी मज करा ॥ ९८ ॥
नव्हे भूल हें महापाप । पावलों मी महदनुताप ॥
चुकलों चुकलों मी निस्त्रप । व्हावें मज सकृप महाराजा ॥ ९९ ॥
लोटांगण घातलें छबीचे चरणा । सखेद गहिंवरलें अंतःकरणा ॥
म्हणती महाराजा दयाघना । करीगा करुणा मजवरी ॥ १०० ॥
ऐसें वदत मुलास पत्र । धाडिलें होऊन अति लाचार ॥
'घडला मजकडून प्रमाद थोर । क्षमा करगा' प्रार्थावें ॥१०१॥

नैवेद्यार्थ शर्करा खंड । बाबासाहेब अर्पीत अखंड ॥
ऐसा नियम चालला उदंड । पडला त्या खंड एकदिनीं ॥ ९० ॥
व्यवहार व्यापृत अंतःकरण। तर्खडांस नाहीं राहिलें स्मरण ॥
होऊनि गेलें सर्वांचें भोजन । नैवेद्याविण एके दिनीं ॥ ९१ ॥
एका मोठ्या गिरणीवरी । तर्खडसाहेब मुख्याधिकारी ॥
तदर्थ प्रातःकाळचे प्रहरीं । जाणें बाहेरी नित्य त्यां ॥ ९२ ॥
पुढें मग दुपार भरतां । बाहेरून परत येतां ॥
पूर्वनिवेदित शर्करा प्रसादता । भोजनीं बसतां पावतते ॥ ९३ ॥
ऐसा नियम चालतां । पडलें एकदां विस्मरण चित्ता ॥
राहिली शर्कराखंडनिवेदनता । प्रसाद ग्रहणता अंतरली ॥ ९४ ॥
करावया बैसतां भोजन । शर्कराशेष स्वैपाकिण ॥
पात्रीं वाढी अनुदिन । तीच कीं जाण अन्नशुद्धि ॥ ९५ ॥
परी ते दिवशीं पूजा समयीं । होऊन कांहीं तरी घाई ॥
शर्करा नैवेद्य राहून जाई । प्रसाद ठायीं पडेना ॥ ९६ ॥
त्याच वेळीं पात्रावरून । तर्खड अनुतापयुक्त होऊन ॥
साईप्रतिमा अभिवंदून । साश्रु नयन बोलत ॥ ९७ ॥
बाबा ही काय माया दाविली । कैसी मजला भूल पाडिली ॥
कवाईतचि मजकरीं घडविली । क्षमा वहिली मज करा ॥ ९८ ॥
नव्हे भूल हें महापाप । पावलों मी महदनुताप ॥
चुकलों चुकलों मी निस्त्रप । व्हावें मज सकृप महाराजा ॥ ९९ ॥
लोटांगण घातलें छबीचे चरणा । सखेद गहिंवरलें अंतःकरणा ॥
म्हणती महाराजा दयाघना । करीगा करुणा मजवरी ॥ १०० ॥
ऐसें वदत मुलास पत्र । धाडिलें होऊन अति लाचार ॥
'घडला मजकडून प्रमाद थोर । क्षमा करगा' प्रार्थावें ॥१०१॥

'दया कराया अनन्यशरणा'। ऐसी साईशीं भाकावी करुणा ॥
अभयकर आणि अभयवचना । मागावें दीना दासातें ॥ १०२ ॥
वांद्रे ग्रामीं हा प्रकार। शिरडी शंभर कोस दूर ॥
तात्काळ तेथें पावली खबर । परिसा तें उद्गार बाबांचे ॥ १०३ ॥
भूत भविष्य वर्तमान। देशकालाद्यनवच्छिन्न ॥
महाराजांस त्रिकालज्ञान । पहा तें प्रमाण प्रत्यक्ष ॥ १०४ ॥
इकडे मुलगा शिरडीस असतां । तेचदिनीं ते समयीं जी वार्ता ॥
घडली साईस वंदूं जातां । श्रोतां सावधानता परिसावी ॥१०५॥
मुलगा येऊन अति उल्हासता । आई समवेत चरण वंदितां ॥
'साई जें आईस बदले तें परिसतां। पावला विस्मितता अत्यंत..१०६॥
" काय करावें आई आज । गेलों मी वांद्र्यास जैसा रोज ॥ "
"नाहीं खावया प्यावया पेज। उपाशी मज यावें लागलें" ॥१०७॥
"कैसा पहा ऋणानुबंध । कवाड होतें जरी बंद" ॥
"तरी मी प्रवेशलों स्वच्छंद। कोण प्रतिबंध मज करी" ॥ १०८ ॥
"मालक नाहीं मिळाला घरीं । आंतडीं माझीं कळकळलीं भारीं "॥
'तसाच मी अन्नाविण माघारीं। भरदुपारीं परतलों" ॥ १०९ ॥
ऐसे हे बोल जेव्हां परिसिले। चिरंजीवांनीं तात्काळ ताडिलें ॥
अपुले वडील बहुधा विसरले। दावाया चुकले नैवेद्य ॥ ११० ॥
मुलगा बाबांस करी विनंती। मजला जाऊं द्या घराप्रती ॥
बाबा तयास जाऊं न देती। तेथेंच घेती ते पूजा ॥ १११ ॥
त्याच दिवशीं शिरडींहून। धाडिलें सविस्तर पत्र लिहून ॥
वितळलें वडिलांचें अंतःकरण। पत्र तें वाचून पाहतां ॥ ११२ ॥
इकडील पत्र तिकडे पावलें । मुलालाही आश्चर्य वाटलें ॥
तयाच्याही नयनीं दाटले। अश्रू लागले वहावया ॥ ११३ ॥

पहा कैसा हा साईचा खेळ। कैसें न प्रेम उचंबळेल ॥
ऐसा कोण पाषाण असेल। जो न द्रवेल येणेनी ॥ ११४ ॥
याच मुलाची प्रेमळ आई। शिरडीस असतां एके समयीं ॥
करीत अनुग्रह बाबासाई। ती नवलाई परिसिजे ॥ ११५ ॥
असतां तेथे भोजनागारीं। पात्रें वाढून झाली तयारी ॥
इतुक्यांत एक श्वान द्वारीं। भुकेलें दुपारीं पातलें ॥ ११६ ॥
भाकर होती जी पात्रावर। श्वानास बाई जों घाली चतकुर ॥
तों एक चिखलांत माखला सूकर। तेथेंच क्षुधातुर पातला ॥११७॥
वार्ता घडली स्वाभाविकपणीं। नाहीं बाईच्या ध्यानीं मनीं ॥
परी दुपारीं आपण होउनी। तीच साईनीं काढिली ॥ ११८ ॥
दुपारीं भोजन जाहल्यानंतर। मशीदींत नित्यक्रमानुसार ॥
बाई येउनि बैसतां दूर। साई सादर पूसिती ॥ ११९ ॥
"आई त्वां आज मज जेऊं घातलें। तेणें हें आकंठ पोट भरलें" ॥
"होते हे प्राण व्याकुळ झाले। ते तृप्त केले गे तुवां" ॥ १२० ॥
"ऐसेंच करीत जावें नित्य ॥ हेंच कामी येईल सत्य" ॥
"मशीदींत बैसून मी असत्य। बोलेन हें त्रिसत्य घडेना" ॥१२१॥
"अशीच माझी दया जाणावी। भुकेल्या भाकर आधीं द्यावी" ॥
"आपुल्या पोटा नंतर खावी। धरावें जीवीं हें नीट" ॥ १२२ ॥
काय वदले हें साईसमर्थ। बाईस कांहींच कळेना अर्थ ॥
काय असावा कीं भावार्थ ॥ वाणी निरर्थक नव्हे कदा ॥१२३॥
म्हणे मी तुम्हास वाढीन ऐसें। घडावें तरी मजकरी कैसें ॥
मीच परतंत्र देऊनि पैसे। मिळेल तसें खातसें ॥ १२४ ॥
"सेवूनिया ती प्रेमाची भाकर। जाहलों मी तृप्ति निर्भर" ॥
"अजून मजला येती ढेकर"। बाबा प्रत्युत्तर करितात ॥१२५॥

जेऊं बैसतां द्वारीं येतां । पोटीं क्षुधेची जया व्याकुलता ॥
त्वां देखिलें ज्या श्वाना अवचिता । मज एकात्मता तया सवें ॥१२६॥
तैसें सर्वांगीं माखिला चिखलासीं । देखिले त्वा जया सूकरासीं॥
भुकेनें व्याकुळ झालेलियासीं । माझी तयासीं एकात्मता ॥१२७॥
ऐकोनि बावांची वचनोक्ती । बाई पावली विस्मय चित्तीं ॥
श्वानें सूकरें मांजरें वावरती । बाबाच काय तीं समस्त ॥१२८॥
कधीं मी श्वान कधीं सूकर । कधीं मी गाई कधीं मांजर ॥
कधीं मुंगी माशी जलचर। ऐसिया विचरत रूपें मी ॥ १२९ ॥
पाही भूतमात्रीं जो मज । तोचि माझिया प्रीतीचा समज ॥
तरी तूं भेदबुद्धीतें त्यज । ऐसीच भज मजलागी ॥ १३० ॥
वचन नव्हे तें परमामृत । सेऊनि बाई सद्गदीत ॥
नेत्र आनंदाश्रुभरित । कंठ दाटत बाष्पांहीं ॥ १३१ ॥
ऐसीच आणीक या बाईची । कथा सुंदर प्रेमरसाची ॥
समर्थ साईच्या भक्तैक्यतेची । एकात्मतेची निज खूण ॥ १३२ ॥
घेऊनि कुटुंब मुलें बाळें । एकदां पुरंदरे शिरडीस निघाले ॥
देई ती दोन वृंताक फळें । प्रेम समेळें तयांसवें ॥ १३३ ॥
विनवी तयांचे कुटुंबास । भरीत एकाचें करी बाबांस ॥
दुजयाच्या तळून काचऱ्या खरपूस । वाढी बहुवस तयांतें ॥ १३४॥
वरें म्हणोनि तीं वांगीं घेतलीं । बाई जेव्हां शिरडीस पातली ॥
आरतीपाठीं भोजनवेळीं । घेऊन गेली भरीत ॥ १३५ ॥
नित्या प्रमाणें नैवेद्य दाउनी । बाई गेली ताट ठेऊनी ॥
सर्वांचे नैवेद्य गोळा करुनी । बाबा भोजनीं बैसले ॥ १३६ ॥
भरीताची चवी चाखितां । लागलें रुचकर वाटिलें समस्तां ॥
काचऱ्या खाव्यासे वाटलें चित्ता । वदती आतां आणा त्या॥१३७॥

१ रघुवीर भास्कर पुरंदरे म्हणून श्रीचे एक भक्त वांद्र्यास राहत असतात ते

निरोप गेला राधाकृष्णीस । बाबा खोळंबले जेवावयास ॥
काचऱ्यावरी गेलें मानस । करावें काय समजेना ॥ १३८ ॥
हंगाम नाहीं हा वांग्यांचा । आतां हा पदार्थ होणार कैचा ॥
शोध पुरंदऱ्यांचे कुटुंबाचा । आणीक भरिताचा चालला ॥ १३९ ॥
तिणें आणिलें जें ताट । भरीत हें तों होतें तयांत ॥
असतील तिचिया सामुग्रींत । वांगीं कदाचित वाटलें ॥ १४० ॥
म्हणूनि तिचें पासीं पुसतां । कळली काचऱ्यांची अन्वर्थता ॥
एवढें बाबांचे प्रेम कां त्यांकरितां । चुकलें समस्तां कळून ॥१४१॥
बाई म्हणे भरीत झालें । एकाचें दुपारीं अर्पण झालें ॥
काचऱ्या नेईन मागाहुन म्हटलें । दुसरें तें चिरिलें तदर्थ ॥१४२॥
पुढें ही वांग्यांची समूळ वार्ता । हळू हळू जैं कळली समस्तां ॥
जो तो आश्चर्य करी चित्ता । पाहूनि व्यापकता साईची ॥१४३॥
आणीक एकदां डिसेंबर मासीं । सन एकूणीससे पंधराचें वर्षीं ॥
याच बाईनें अति प्रेमेसीं । पेढा बाबांसीं पाठविला ॥ ॥ १४४ ॥
बाळाराम परलोकवासी । क्रिया कर्मांतर करावयासी ॥
मुलास त्याच्या जाणें शिरडीसी । पुसावयासीं पातला ॥१४५॥
जातों म्हणून सांगावयासी । आला मुलगा तर्खडांपाशीं ॥
तयासवें कांहीं बाबांसी । धावें मनासीं कुटुंबाच्या ॥ १४६ ॥
पेढयावांचून दुसरे कांहीं । पाहूंजाता घरांत नाहीं ॥
आधींच निवेदित पेढा तोही । मुलास घाई जाण्याची ॥ १४७ ॥
शिवाय तो मुलगा सुतकी । पेढाही एक उच्छिष्ट शिलकी ॥
तोच पाठवी तयासवेंच कीं । साई मुखीं अर्पावया ॥ १४८ ॥
म्हणे दुसरें कांहीं नाहीं । हाच आतां घेऊन जाई ॥
प्रेम पुरसःर हाच देई । खातील साई आवडीनें ॥ १४९ ॥

पेढा गोविंदजीनें नेला । परी तो जेव्हां दर्शनार्थ गेला ॥
पेढा बिऱ्हाडीं विसरून राहिला । धीर तैं धरिला बाबांनीं॥१५०॥
पुढें जेव्हां तिसरें महरीं । मुलगा पुनश्च आला दरबारी ॥
तेंव्हांही विसरला पूर्वीच्या परी। आला रिक्त करीं मशीदीस॥१५१॥
"त्वां मजसाठीं काय आणिलें" । बाबांनीं त्यास पुसून पाहिलें ॥
"कांहीं नाहीं" म्हणतां पुसिलें । स्मरण दिधलें लवमात्र ॥१५२॥
"तुला कोणी कांहीं वस्त । दिधली नाहीं का मजमीत्यर्थ" ॥
"नाहीं" म्हणतां साई समर्थ । प्रश्न स्पष्टार्थ पूसिती ॥ १५३ ॥
"अरे घराहून निघते वेळीं । नाही कां दिधला तुझिया जवळी ॥
खाऊ आईनें प्रेमसमेळी" । तेव्हां मग झाली आठवण ॥ १५४ ॥
जाहला अति लज्जायमान । कैसें तरी पडलें विस्मरण ॥
अधोवदन क्षमा मागून । चरण वंदूनि निघाला ॥ १५५ ॥
धांवत धांवत बिऱ्हाडीं गेला । पेढा आणून बाबांस दिधला ॥
हातीं पडतांच मुखीं समर्पिला । भाव संतर्पिला आईचा ॥१५६॥
ऐसा हा साई महानुभाव । जया मनीं जैसा भाव ॥
तया तैसा देऊनि अनुभव । भक्तगौरव वाढवी ॥ १५७ ॥
आणिक या कथांचें इंगीत । भूतीं सदैव पहावा भगवंत ॥
हेंचि सकल शास्त्र संमत । हाचि सिद्धांत येथील ॥ १५८ ॥
आतां पुढील अध्याय श्रवणीं । कळोन येईल बाबांची राहणी ॥
कोठें ते निजत कवण्या ठिकाणीं । सावचित्तपणीं आकर्णिजे ॥१५९॥
हेमाड साईपदीं शरण । श्रोतां आदरें करिजे मनन ॥
झालिया कथेचें निदिध्यासन । कृत कल्याण पावाल ॥ १६० ॥
इति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
साई समर्थ सच्चरिते ॥ नवमोध्याय संपूर्णः ॥ १६१ ॥

श्री सद्गुरुसाईनाथार्पणमस्तु शुभंभवतु ॥

१ बाबाराम मानकर म्हणून बाबांचे एक भक्त होते त्यांचा हा मुलगा.

## विज्ञप्ति.

श्री साईलीलेचे अंक दर महिन्यास शुद्ध १२ पर्यंत सर्व पोष्टांत पडतात व ते ग्राहकांना दर महिन्यास पौर्णिमेपर्यंत बहुतेक पोहोंचले पाहिजेत. पोष्टांत क्वचित अंक गहाळ होत असतील व त्यामुळें ग्राहकानी अंक न मिळाल्याची तक्रार पौर्णिमेपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांनां पुन्हां अंक पाठविण्यांत येईल. कित्येक ग्राहकांची एखादा अंक न मिळाल्याची तक्रार २।३ महिन्यानीं उशिरा येते. इतक्या उशिरा पुन्हां अंक पाठविणें अशक्य असल्यामुळें ही सूचना देणें भाग पडत आहे.

---

"वार्षिक वर्गणी तीन रुपये. टपाल हांशीलसह तीन रुपये सहा आणे व्ही. पी. नें तीन रुपये आठ आणे. फुटकळ अंकास पांच आणे."

## अभिप्राय

श्रीगणेश मोफत वाचनालय, पुणें या संस्थेचा द्वितीय व तृतीय वार्षिक अहवाल चिटणीसानीं आमचेकडे अभिप्रायार्थ पाठविला आहे, त्याबद्दल आम्हीं आभारी आहोंत. संस्थेचा हेतु नांवावरूनच व्यक्त होत आहे. संस्था अद्याप बाल्यावस्थेंत आहे परंतु चिटणीस प्रभृति मंडळींच्या प्रयत्नानीं लवकरच ती नांवारूपास येईल असें वाटतें.

पान १० वरील "मुख्य चिटणीसास दरमहा ५ रु. पर्यंत पगार देण्याचा ठराव" हें वाक्य गैरसमज उत्पन्न करणारें आहे. "दरमहा ५ रु. पर्यंत पगार देण्याच्या अधिकाराचा ठराव" असावा, असें वाटतें. पान १२ मध्यें दिलेल्या नियतकालिकांच्या यादींत, भर किंमत देऊन घेतल्या जाणाऱ्या थोडथोडक्या नियतकालिकांत कांहीं खुद्द पुण्यांतील नियतकालिकांचीं नांवें पाहून आश्चर्य वाटतें व त्या नियतकालिकांच्या संपादकाचे व दुय्यम संपादकाचे "संस्था लोकाश्रयास पात्र आहे यांत संशय नाहीं." "धनिकांनीं मदत केल्यास सत्पात्रीं दान केल्यासारखें होईल" अशा शब्दांत दिलेले अभिप्राय वाचून तें आश्चर्य द्विगुणित होतें.